ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

एप्रिल २००९ ● मूल्य १० रुपये



भावगीतजनक जी.एन. जोशी




छायाचित्रकार सी.आर. शेलारे

## कलावसंताचा बहर



तबलामहर्षी भाई गायतोंडे






आठवणींतले बाबासाहेब पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी –सुदेश हिंगलासपूरकर,
लेखक योगीराज बागूल, सुशीलकुमार शिंदे, भाई वैद्य आणि उदयशंकर झा




कृतार्थ मुलाखतमालेत प्रसिद्ध शल्यविशारद डॉ. वि.ना. श्रीखंडे यांच्याशी
बातचीत करताना शिरीष वीरकर
(वृत्तांत पुढील अंकी)

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**एप्रिल २००९**
**वर्ष २९ वे, अंक ४ था, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : संस्थांना १०० रु.**
**व्यक्तींना ६० रु.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला,
टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर,
ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
२३८९ २४ ४५ फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स. न.

वारकऱ्यांसमोर टप्प्याटप्प्याने माघार घेत डॉ. आनंद यादव यांनी शेवटी महाबळेश्वर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. संघर्षाच्या पहिल्या टप्प्यावर त्यांचे अवसान गळले आणि समजातूनही विशेष काही पाठिंबा मिळतोय असे दिसले नाही. वर्तमानातल्या वास्तवाला सामोरे न जाता इतिहासात रमणाऱ्या, थंड पडत चाललेल्या समाजाची ही लक्षणे आहेत. 'विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकटले' याहून उत्तंग वैश्विक संकल्पना नसेल. तरी महाराष्ट्रीय मानसिकतेला निष्क्रिय बनवण्यातही संतपरंपरेचा मोठा हात आहे. ऐतिहासिक व्यक्तींकडे बारा महिने–चोवीस तास सतत फक्त देवत्वाच्या भावनेतून बघण्याची फाजील सवय आपल्याला लागली आहे. तीही हाडामासाची माणसे होती, त्यांचेही गुणदोष होते हे आपण कधी समजणार!

बुद्धी व विवेक जागृत ठेवून ज्ञानलालसा–जाणिवा वाढवणे – वर्तमानाला सामोरे जाणे – यासाठी ग्रंथाली प्रयत्नशील असते.

**– संपादक**

## अनुक्रम

- **आमचे दादा –** जया चंद्रा / २
- **जी.एन. जोशी आणि मी –** पं. शिवकुमार शर्मा / ६
- **तबलामहर्षी भाई गायतोंडे –** शब्दांकन : शर्मिला पिटकर / ८
- **एक अवलिया –** मनोज आचार्य / १३
- **बिझिनेस स्कूल्समधून प्रशिक्षित... –** प्रभाकर नानावटी / १५
- **लीपीचे प्रमाणीकरण म्हणजे काय? –** शुभानन गांगल / १७
- **पुस्तक प्रकाशन वृत्तांत** / १८
- **सु.गो. तपस्वी यांची मुलाखत** / २०



जी. एन. जोशी

'रानारानात गेली बाई शीळ', 'नदीकिनारी नदीकिनारी' अशा कवितांना स्वरसाज चढला आणि मराठी भावगीताचा जन्म झाला. त्याचे जनक जी.एन. जोशी यांची जन्मशताब्दी एप्रिल महिन्यात आहे. भावगीतजनक असलेल्या जोशींनी एचएमव्हीच्या माध्यमातून, त्या काळातल्या दिग्गज गायक-वादकांची कला, त्यांचे मूड सांभाळत, ध्वनिमुद्रित करण्याचं महत्त्वाचं कार्य केलं. आज आपण त्या कलावंतांना ऐकू शकतो याचं श्रेय जी.एन. जोशींकडे जातं. या द्रष्ट्या कलावंताच्या जन्मशताब्दी निमित्तानं...

# आमचे दादा

## जया चंद्रा

जुन्या पिढीतील प्रसिद्ध गायक आणि 'भावगीत' या संगीतविशेषाचे जनक जी.एन. जोशी- दादा- हे माझे वडील. ६ एप्रिल २००९ हा त्यांचा जन्मशताब्दी दिन.

१९३० ते ४०च्या दरम्यान त्यांच्या ७८ आरपीएमच्या रेकॉर्ड लोकप्रिय होत्या. घरोघरी, कोपऱ्या-कोपऱ्यावर, रेडिओवर त्यांची गाणी ऐकू येत. ही गाणी गुणगुणणारी पिढी आज बहुतांशी काळाच्या पडद्याआड गेली आहे. पण आजही, क्वचित एखादे आजोबा, एखाद्या आजी जेव्हा आपण कसे त्यांचे गाणे ऐकायला उत्सुक असायचो, कसे त्यांच्या मैफलीला आवर्जून जायचो, कशी ती त्यांची गाणी सतत जिभेवर रेंगाळायची असे एखाद्या कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या उत्साहाने सांगतात, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील भावांवरून त्यांचे मन 'त्या सोनेरी' काळात पोचलं आहे हे लगेच जाणवतं. त्यावेळी त्यांचे थकलेले डोळे, गालांवरच्या सुरकुत्या कुठच्या कुठे लुप्त होतात आणि क्षणभरच एक रसरशीत तरुण भाव चेहऱ्यावर चमकून जातो. दादांच्या भावगीतांना, काहीशा खट्याळ, लोभस आणि खोडकर, तरुण मनाला 'नवी भरारी' देणाऱ्या, कधी जरा अंतर्मुख करणाऱ्या तर कधी मधुराभक्तीने भारलेल्या गीतांना मिळणारी ही खरीखुरी दाद असते.

'डोळे हे जुल्मी गडे', 'रानारानात गेली बाई शीळ', 'काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे', 'एकत्र गुंफून जीवित धागे', 'अमुचे नाव आसू', 'माझ्या फुला उमल जरा', 'फार नको वाकू जरी उंच बांधा' वगैरे गाणी कदाचित तुम्हीही ऐकली असतील.

१९००-१९२५ च्या काळात संगीत-कला निकृष्ट अवस्थेस पोचली होती. बहुतेक गायक-वादक कलाकार संस्थानिक राजेरजवाड्यांच्या दरबारी, ऐषारामात मशगुल होते. मोगल आमदानीत, त्यांच्या आश्रयात लागलेल्या चैनी व विलासी सवयी त्यांनी उचलल्या होत्या. कलाकार चैन व व्यसनांमुळे लहरी बनले होते. त्यामुळे सुसंस्कृत समाज या संगीत कलाकारांपासून चार हात दूर राहत असे. अशा परिस्थितीतूनही अभिजात (शास्त्रोक्त किंवा क्लासिकल) संगीताच्या निस्सीम पूजकांनी मुसलमान उस्तादांची अहर्निश सेवा करून त्यांच्यापासून संगीतविद्या संपादन केली. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे, विष्णू दिगंबर पलुस्कर आदींनी अक्षरश: तपश्चर्या करून ही विद्या प्राप्त केली. मुसलमान गवयांकडून हस्तगत केलेल्या या शास्त्रीय विद्येवर पुढे भास्करबुवांनी गंधर्व नाटक कंपनीत, रहिमतखाँसाहेब यांनी किर्लोस्कर कंपनीत, 'ललितकलादर्श'मध्ये रामकृष्ण-बुवांनी नवीन साज चढवला व नाट्य-संगीताचा जन्म झाला. बालगंधर्व, मास्टर कृष्णराव, मास्टर दीनानाथ मंगेशकर इत्यादी गायकनटांनी शास्त्रोक्त रागांत बांधलेली, मधुर चालींनी नटलेली पदे संगीत नाटकांतून सादर करण्यास सुरुवात केली.

प्रथम चोरून नाटकाला जाणारी मंडळी आता सहकुटुंब नाटकांना जाऊन नाट्यगीतांच्या माध्यमाने अभिजात संगीताच्या आस्वाद घेऊ लागली. परंतु बहुतेक सर्व नाट्यगीतांच्या शब्दरचना क्लिष्ट आणि दुर्बोध असत. उदाहरणार्थ, 'ललना मना' हे 'एकच प्याला' नाटकातील अतिशय लोकप्रिय पद घ्या.

*'ललना मना, नच अवलघ शंका,*
*अणुहि सहते,*
*करा सृजनी त्याच्या विविध तरलगे*
*विम प्रकृतिसी पुण्य परम'*

ह्या पद्यांतून संगीतप्रेमींना काहीच अर्थबोध होत नसे. केवळ स्वरांचे नादमाधुर्य हेच या पदाचे वैशिष्ट्य होते.

अशा तऱ्हेने समाजाला नाट्य-संगीतातून शास्त्रीय संगीताचे वैचित्र्य मिळू शकत होते, पण अर्थबोधाची वानवा होती.

बहुजन समाजाला तमाशाचे फड, लावण्या यांच्या माध्यमांतून सुलभ, सुगम - श्रोत्यांच्या मनाला गुदगुल्या करणारी - अर्थाची गंमत असणारी संगीतरचना मिळे, पण त्यांत संगीताचे वैचित्र्य नव्हते.

म्हणजेच त्या काळात, एका टोकास आध्यात्मिक नीतीपर काव्यरचना किंवा दुर्बोध नाट्यगीतं व दुसऱ्या टोकास अतिसुलभ पण काहीशी साचेबद्ध तमाशातील पद्यरचना अशी परिस्थिति होती.

म्हणूनच, या दोन्ही टोकांच्या सुवर्ण-मध्यावर, अर्थपूर्ण व सुंदर कवितांना अर्थवाही मधुर चाली लावून गाण्याचे श्रेय प्रथम दादांना मिळाले. इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासामुळे त्या काळातील सुजाण तरुण पिढीचा दृष्टिकोन बदलू लागला होता. केवळ पारमार्थिक कविता न लिहिता, कवी भोवतालचे जीवन, साधी सुख-दुःखे, निसर्ग अशा विषयांवर काव्य करू लागले होते. 'भावनांचे सहजस्फूर्त उद्‌गार' ही काव्याची नवी व्याख्या बनू लागली होती.

मराठीतील अशा नवीन ढंगाच्या भावकवितेला अर्थानुरूप, कवितेतील वातावरण व भावनांना अनुरूप अशा मधुर चालींचा साज चढवून, शब्द, अर्थ आणि भाव या तिन्ही गोष्टींचा सुंदर मेळ करून, त्या कवितेचे 'भावगीता'त रूपांतर करण्याचे श्रेय दादांना दिले जाते. कवी ना.घ. देशपांडे यांची 'शीळ' ही कविता दादांनी १९३१ साली प्रथम रेडिओवर गायली व त्या भावगीताने महाराष्ट्रातील तत्कालीन तरुण पिढीला मोहून टाकले.

विदर्भातील खामगाव या छोट्या शहरात, प्रतिष्ठित वकील कुटुंबात १९०९ साली दादांचा जन्म झाला. घरातील परंपरेनुसार त्यांनी मोठेपणी वकिली करावी अशी स्पष्ट अपेक्षा घरच्यांकडून होती. ज्यात्याच आवड असल्यामुळे लहानपणी दादांनी गाणे शिकण्याची परवानगी मिळाली. त्या काळात प्रतिष्ठित कुटुंबांतील मुलांना ही मुभा सहजासहजी मिळत नसे, पण माझ्या आजोबांनाही गाण्याची आवड असल्यामुळे, वकिलीचा अभ्यास सोडणार नाही व घराण्याच्या प्रतिष्ठेलाही डाग लागू देणार नाही अशी दादांनी हमी दिल्यामुळे आजोबांनी संमती दिली व लहानपणापासूनच शास्त्रीय संगीताचे बाळकडू दादांना मिळाले. पुढे, नागपूर इथे मॉरिस कॉलेजमध्ये शिकत असतानाही शास्त्रीय संगीताचे शिक्षण त्यांनी कायम ठेवले. त्यामुळेच त्यांच्या बऱ्याच भावगीतांना शास्त्रीय संगीताचा बाज आहे. त्याचप्रमाणे, काही कविता खेळकर, उडत्या चालींच्या असल्या तरी त्यांच्या गाण्यांतून त्यांचा शास्त्रोक्त संगीताचा पाया सहज प्रकट होतो.

नंतरच्या काळातील भावगीतांच्या तुलनेत जरी दादांची गीते जास्त शास्त्रोक्त पद्धतीची वाटली तरी त्यांच्या अनेक गाण्यांना नवीन पद्धतीच्या, कवितेतील वातावरणा-

**आयुष्यातील नावीन्याला, नवीनतेला खुल्या दिलानं सामोरं जावं, जे जे सुसंस्कृत व सुंदर असेल ते मोकळ्या मनानं स्वीकारावं अशी त्यांची भूमिका असे. एकूणच जीवनातील सर्व सुंदर गोष्टींचा मनसोक्त आस्वाद घेण्याची त्यांची मनोवृत्ती होती. त्यांच्या आनंदी, उत्साही स्वभावाची आणि यशाची हीच मेख असावी. म्हणूनच आजही मला आठवतात ते पिझ्झाच्या स्लाईसवर वालाचं बिरडं घालून खाताना ''वा:! काय मजा आला'' म्हणणारे आमचे दादा.**

नुरूप चाली आहेत. उदाहरणार्थ,

*'काळ्या गढीच्या जुन्या, ओसाड भिंतीकडे*
*आलीस तू एकटी, बांधून सारे चुडे'*

हे भावगीत.

*काळी निनावी भीती, होती उभी भोवती*
*वाटेत होते किती काटेकुटे अन् खडे*
*हुंकारला पारवा, तेजाळला काजवा*
*हालून गेला जरा अंधार मागेपुढे...*

मंद वारा, कुंद पण धुंद रात्र, काहीसे गूढ, काळोखे पण तरीही प्रणयोत्सुक वातावरण, जुन्या ओसाड गढीच्या पडक्या भिंतीकडे, आवाज होऊ नये म्हणून हातातील किणकिणते चुडे घट्ट बांधून आलेली प्रेयसी हे सारे दादांनी अगदी तशाच गूढरम्य, संगीताच्या साथीने अतिशय सुंदर गायले आहे.

त्याचप्रमाणे कवी माधव ज्युलियन यांची 'संगमोत्सुक डोह' ही कविता. या भावगीतांतील दादांचा काहीसा कातर, विषण्ण सूर त्या डोहाचा प्रणयार्त, मीलनोत्सुक भाव खऱ्या अर्थाने बोलका करतो.



अशा अनेक भावगर्भ कविता दादांनी तितक्याच भावमधुर गीतांतून सादर केल्या. त्यांच्या भावगीतांच्या कार्यक्रमांना प्रचंड प्रतिसाद मिळू लागला आणि His Master's Voice - HMV - या त्या काळातील सर्वात मोठ्या रेकॉर्ड कंपनीनं त्यांना 'शीळ' ध्वनिमुद्रित करण्याकरता आमंत्रण दिलं. त्या रात्री, दोन गाणी गाण्याकरता गेलेले दादा चौदा गाणी रेकॉर्ड करून आले. घरोघरी, जागोजागी, दुकानातून, रेस्टॉरंटमध्ये त्यांच्या रेकॉर्ड ऐकण्यासाठी उत्सुक तरुणमंडळी गर्दी करू लागली. पुढची सात-आठ वर्षे दादांच्या गाण्यांच्या असंख्य ध्वनीमुद्रिका निघाल्या व भावगीत गायक म्हणून त्यांची लोकप्रियता शिगेस पोचली.

यानंतर थोड्याच दिवसांनी एचएमव्हीचे इंग्लिश मॅनेजर हॅरी इव्हान्स यांनी दादांना एचएमव्हीचे रेकॉर्डिंग एक्झिक्युटिव्ह होण्याची ऑफर दिली. त्यावेळी गाण्याच्या जोडीने दादा मुंबई हायकोर्टात वकिलीही करत होते. गाणे की वकिली हे द्वंद्व मनात सतत होते. वकिलीत जम बसत असला तरीही संगीताची ओढ होती. त्याच सुमारास एका ज्येष्ठ, अनुभवी न्यायाधीशांनी दादांना सल्ला दिला, ''Mr. Joshi, law is a jealous mistress. You will have to choose one or the other!''

एचएमव्ही कंपनीची ऑफर आल्यानंतर, विचारांती दादांनी संगीतक्षेत्रात पूर्णपणे जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर, ''संगीताच्या स्वरांनी कायद्याच्या कलमांवर मात केली.'' आणि १९३८ साली दादांची एचएमव्हीचे प्रमुख रेकॉर्डिंग एक्झिक्युटिव्ह म्हणून कारकीर्द सुरू झाली. माझ्या मते, संगीतक्षेत्रात दादांनी केलेल्या कार्याचे हे दुसरे व तितकेच महत्त्वाचे पर्व आहे.

त्या काळात शास्त्रीय संगीताचे बरेचसे कलाकार बुरसटलेल्या विचारांचे व लहरी होते. स्वत:जवळ असलेलं ज्ञान व कला सढळ हाताने शिष्यांना देणारे किंवा ध्वनिमुद्रिकेद्वारे त्याचं प्रसारण करू इच्छिणारे कलाकार दुर्मीळच होते. साडेतीन मिनिटांच्या अत्यल्प अवधीत आपलं गानकौशल्य दाखवण्यात अनेक कलाकारांना विशेष रस नसे. वेळेचं बंधन, रेकॉर्डिंग स्टुडियोच्या मर्यादा (साधे साऊंड-प्रुफिंग, एअर कंडिशनिंग वगैरेंचीही वानवाच असे), मेणाच्या तबकडीवर करावं लागणारं सदोष ध्वनिमुद्रण अशा अनेक तांत्रिक अडचणींना तोंड देत असतानाच अनेक कलावंतांशी संवाद साधून, पुढच्या पिढीकरता त्यांचं गाणं सुरक्षित करण्याचं मोठे काम दादांनी केले. त्यामुळे काही अतिशय जुनं, दुर्मीळ संगीत आजही उपलब्ध आहे.

एचएमव्ही कंपनीचे उद्दिष्ट अर्थात व्यापारी होतह. कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना संगीताच ज्ञान किंवा कलेची आणि कलाकाराची कदर नसे. कंपनीच्या दृष्टीनं फायदेशीर पण अभिजात संगीताच्या कसोटीनंही उत्कृष्ट असंच संगीत मिळवणं, कंपनीच्या बथ्थड व केवळ नफ्या-तोट्याची पर्वा असणाऱ्या वरिष्ठांची मर्जी सांभाळून, प्रसंगी त्यांना योग्य ती 'समज' देऊन प्रसिद्ध कलाकारांच्या बरोबरीने नवोदित, पण कलेचा स्फुल्लिंग असलेल्या कलाकारांचेही ध्वनिमुद्रण करणे ही तारेवरची कसरत दादांना करावी लागे. तरीही कंपनीचा व्यापारी दृष्टिकोन सांभाळत असतानाच, कलेचा व कलाकाराचा सन्मान दादांनी राखला हे विशेष म्हणावे लागेल. जुन्या पठडींतील अनेक कलावंतांना केवळ जास्त रोख रकमेऐवजी 'रॉयल्टी' बरी हा व्यवहार ते समजावून देत व त्यांचं आर्थिक हितही सांभाळत.

याहीपेक्षा दादांची खरी खासियत होती ती त्यांच स्व संवेदनाक्षम कलावंताचं मन. प्रत्येक कलाकाराचं काय वैशिष्ट्य आहे, त्याची अंगभूत प्रकृती कशा प्रकारची आहे, त्याला काय विशेष आवडते, काय केलं असता त्याच्या चित्तवृत्ती फुलून येतील हे त्यांना सहजपणे उमगत असे. त्यामुळे प्रत्येक कलाकाराशी कसे वागावे, त्याचे मन कसे वळवावे हे ओळखून, त्यांचा मूड सांभाळून, त्याला स्वाभाविकपणे खुलवून कलाकाराच्या कलेचा सर्वोत्कृष्ट आविष्कार ते तबकडीवर, टेपवर कायमस्वरूप मिळवत. केवळ आर्थिक मोबदल्यानं खऱ्या कलावंताचं समाधान होत नसत. जोडीने त्याच्या कलेची खरी कदर झाली, त्याच्या कलेला जाणकार





श्रोत्यांकडून दाद मिळाली तर त्याची कला खऱ्या अर्थाने खुलून येते. मला वाटते, हे समाधान दादा कलाकारांना देत.

अर्थात कलावंतांनाही दादांच्या चोखंदळ आवडीनिवडीचे, पसंतीचे भान ठेवावं लागे. कारण ध्वनिमुद्रणाच्या वेळी मृदु शब्दांत, योग्य आर्जवाने पण तितक्याच परखडपणे दादा मत देत असत. त्यामुळे मोठमोठे कलाकारही दादांच्या पसंतीस उतरेपर्यंत पुन्हा पुन्हा ध्वनिमुद्रण करत.

बेगम अख्तर यांचा एक किस्सा यासंबंधात सांगण्यासारखा आहे. दादा एचएमव्हीमधून निवृत्त झाल्यावर बेगमसाहिबांचं एक रेकॉर्डिंग झालं. नेहमी फक्त तबला, पेटी, सारंगीच्या साथीने गाणाऱ्या बेगमसाहिबांना यावेळी सतार, फ्लूट इत्यादी अनेक वाद्यांच्या मेळाबरोबर गावं लागलं होतं. गझलेच्या दोन कडव्यांच्या मध्ये जो वाद्यांच्या तुकडा बांधला होता. त्याचं भान ठेवूनच अर्थात त्यांना गावे लागले. परंतु त्यामुळे त्यांची स्वैर विहार करणारी गाण्याची शैली जरा बंदिस्त, थोडी कृत्रिमशी झाल्याचे दादांना जाणवलं. नेहमीच्या गाण्याची सर या रेकॉर्डिंगला आली नाही असे दादांना वाटल्याचे कुणीतरी बेगमसाहिबांना सांगितले. दादांच्या याबाबतींतील चोखंदळ स्वभाव माहीत असल्यामुळे, ते उगीचच असे म्हणणार नाहीत हे त्या जाणून होत्या. त्यामुळेच त्यांना वाटू लागलं की आपले गाणे त्या दिवशी फारच वाईट झाले आणि त्या दु:खी झाल्या. त्या दिवशी ठरलेला एक कार्यक्रमही त्यांनी रद्द केला. हे सारे कळल्यावर दादांनी त्यांच्याशी बोलून, त्यांना तसे का वाटले हे समजावून दिल्यावरच त्यांचे समाधान झाले.

एचएमव्हीच्या चौतीस वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत दादांना असंख्य कलाकारांचे, संगीतकारांचे, कलाप्रेमींचे जवळून दर्शन झाले. कुंदनलाल सैगल, बेगम अख्तर, बडे गुलाम अली खान, अमीर खान, पंडित रविशंकर, पंडित डी.व्ही. पलुस्कर, सूरश्री केसरबाई केरकर, पंडित भीमसेन जोशी आणि इतर असंख्य प्रसिद्ध कलाकारांचे त्यांना आलेले भलेबुरे अनुभव, प्रसंगी काहीसे कडू पण बहुतांशी गाभुळलेल्या चिंचेसारखे आंबटगोड अनुभव त्यांनी आपल्या 'स्वरगंगेच्या तीरी' या पुस्तकात नमूद केले आहेत.

जन्मशताब्दीच्या निमित्ताने ह्या पुस्तकाची नवीन आवृत्ती निघणार आहे. जुन्या पिढीतील अनेक प्रसिद्ध गायकांचे मनोज्ञ दर्शन यातून आपणाला मिळेल.

एचएमव्हीमध्ये काम करत असताना दादांनी ध्वनिमुद्रणाच्या क्षेत्रात अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग केले. लहान मुलांकरता केवळ गाणी व गोष्टीच नव्हेत तर थोर व्यक्तींची चरित्रे आणि भाषणांच्याही रेकॉर्ड त्यांनी काढल्या. चांगल्या कवींच्या काव्यवाचनाच्या, काव्यगायनाच्या, नाट्यवाचनाच्या, अनेक विचारवंतांच्या भाषणांच्या रेकार्ड काढल्या. आज हे सारे आपण कॅसेट व सीडीवर बघतो आहोत, पण पन्नास वर्षांपूर्वी हे सर्व करण्यामध्ये दादांचं पुरोगामीत्व अणि दूरदृष्टी दिसून येते.

एमएचव्हीतून निवृत्त झाल्यावर ते सात वेळा माझ्याकडे अमेरिकेत आले. वयोमनाप्रमाणे शेवटच्या एक-दोन सफरी वगळता, बाकी प्रत्येक वेळी त्यांनी अमेरिकेतील निरनिराळ्या विद्यापीठांच्या म्युझिकल विभागामध्ये भारतीय अभिजात संगीतावर डेमॉन्स्ट्रेशनसह लेक्चर दिली. पंचवीस वर्षांपूर्वी आजच्यासारखे तानपुरा किंवा तबला मशीन उपलब्ध नव्हते. तरीही ते इथं येताना तानपुरा व तबला टेप करून आणत व शास्त्रीय संगीतातील राग, ताल यांची माहिती, त्यातील सौंदर्यस्थळे काय आहेत, ती कशी ओळखावी, त्यांचा आस्वाद कसा घ्यावा हे प्रात्यक्षिकासहित विषद करत. भारतीय संगीताची. विशेषत: वाद्यसंगीताची ओळख पाश्चिमात्य देशात पंडित रविशंकर, उस्ताद अली अकबर खान यांच्यामुळे झाली आहे. पण आपल्या संगीतातील, विशेषत: कंठ गायकीची सौंदर्यस्थळे, मर्मस्थळे ओळखून-समजून त्याचा आस्वाद घेऊ शकणारे रसिक थोडे आहेत. तोडगा म्हणून दादांनी 'Understanding Indian Classical Music' हे पुस्तक लिहिले. परंतु या पुस्तकापेक्षाही त्यांनी दिलेल्या डिमोन्स्ट्रेशन लेक्चरमुळे अनेक विद्यापीठांतील म्युझिक हा प्रमुख विषय (मेजर) शिकणाऱ्या व शिकवणाऱ्या संगीतप्रेमींना भारतीय अभिजात संगीताचा परिचय झाला. त्यामुळे प्रत्येक ट्रीपमध्ये संगीताचे प्रोफेसर व विद्यार्थी दादांचे मित्र व चाहते बनत. भारतात परतल्यावरही अनेकांशी दादांचा पत्रव्यवहार नियमितपणे चालत असे.

दादांचे विचार त्यांच्या काळाच्या मानानं प्रगत होते. १९६८ साली जेव्हा मला एकटीला शिक्षणासाठी पाठवलं तेव्हा त्यांनी मला सांगितले होते, ''When in Rome, behave like a Roman!'' (या अनुषंगाने एक मजेदार प्रसंग आठवतो. त्यांच्या लग्नाच्या पन्नासाव्या ॲनिवर्सरीच्या दिवशी दादा व आई इथे अमेरिकेत होते. त्या दिवशी मुद्दाम जाऊन त्यांनी आईसाठी फुले आणली. अर्थात, 'काय हा पोरकटपणा' असा आईचा रोष त्यांना पत्करावा लागला ही गोष्ट वेगळी!)

आयुष्यातील नावीन्याला, नवीनतेला खुल्या दिलानं सामोरं जावं, जे जे सुसंस्कृत व सुंदर असेल ते मोकळ्या मनानं स्वीकारावं अशी त्यांची भूमिका असे. एकूणच जीवनातील सर्व सुंदर गोष्टींचा मनसोक्त आस्वाद घेण्याची त्यांची मनोवृत्ती होती. त्यांच्या आनंदी, उत्साही स्वभावाची आणि यशाची हीच मेख असावी. म्हणूनच आजही मला आठवतात ते पिझ्झाच्या स्लाईसवर वालाचं बिरडं घालून खाताना ''वा:! काय मजा आला'' म्हणणारे आमचे दादा.

**Mrs. Jaya Chandra (Joshi)**
8513,Perry Rd Loisville,
Kentucky 40222
U.S.A.
E-mail : jaya111@hotmail.com

# जी. एन. जोशी आणि मी

## पं. शिवकुमार शर्मा

अकस्मात एक प्रस्ताव समोर आला की मी जी. एन. जोशीसाहेब यांच्यावर लिहावे. लिहिणे हा काही माझा व्यवसाय नाही. तरीही. प्रस्ताव समोर आल्यावर छानशी झुळुक अंगावरून जावी अशा सुगंधित आठवणी आल्या. जोशीसाब व मी, जोशीसाब व एच.एम.व्ही, एच. एम.व्ही. आणि मी. एकोणीसशेसाठ सालपासूनचे बंदिस्त मनाचे कप्पे हळुवारपणे, अलगद उघडले गेले.

तसा मी अकस्मातपणेच मुंबईच्या महानगरात, मायानगरात थडकलेला. घरी वडिलांचा काहीसा रोष पत्करूनच घर सोडून आलेला. जम्मू रेडिओवरची, आयत्या नोकरीची लालूच नाकारून, संगीतावर freelansing नावाची मुशाफिरी करायला निघालेला मी, आलो इथे. तसे बघायला गेले तर वडिलांची सांगीतिक तालीम व आशीर्वाद आणि बरेचसे अनोळखी वाद्य घेऊन इथे मी काय व कसे काम करणार याची सुतराम कल्पना नसताना आलो, पण समजेना करायचे काय? जरा गुश्शातच बाबांच्या शिफारशी नाकारल्या आणि इथे आल्यावर समजले की गाठीशी असलेले भांडवल आहे एवढे पुरेसे नाही. माझ्या गाठी ओळखी दोनच-एक ज्येष्ठ ब्रीज नारायणजी, जे सूरसिंगार म्युझिक संसद सर्कलचे अध्वर्यू होते आणि हरिदास संगीत संमेलनाचे आयोजन करणारे आणि राजकमलचे संगीत-दिग्दर्शक वसंत देसाई.

तसा १९५४-५५ मध्ये मी मुंबईत वाजवून गेलो होतो. पण ते वेगळे आणि हे वेगळे. हरिदास संमेलन वर्षातून एकदा होई, परंतु वसंत देसाईंनी मात्र ताबडतोब साथ दिली. 'झनक झनक पायल बाजे'मध्ये ऋतूंवर पिक्चराईझ झालेले 'रशेस' त्यांनी मला दाखवले व त्या अनुषंगाने मला वाजवायला सांगितले. त्या अनुषंगाने मी वाजवले. ते ऐकून माझे त्यांनी ते तसेच्या तसे सिनेमात वापरायचे असा निर्णय घेतला व शांताराम-बापूंची स्वत: ओळख करून दिली. शांता-रामबापूंनीही पुढच्या पिक्चरसाठी संगीत-दिग्दर्शन सोपवण्याची जबाबदारी देण्याची तयारी दाखविली.



पं. शिवकुमार शर्मा

ऐकायला छान वाटले तरी त्याने गुजराण थोडीच होणार होती! कुठल्या तिथीचा मुहूर्त होता मला आठवत नाही पण वसंत देसाईंच्या शिफारशीने मी एचएमव्हीच्या पायऱ्या चढलो ते त्या कंपनीच्या एका फार मोठ्या अधिकारी माणसाकडे उमेदवारी मागण्यासाठी. त्या व्यक्तीचे नाव होते श्री.जी.एन.जोशी.

जी.एन. साहेबांशी झालेली ती पहिली भेट मी कधीच विसरू शकत नाही. ते म्हणाले, ''अहो शिवकुमार, तुम्ही होता कुठे? आम्हाला प्रश्न पडला होता की तुम्हाला कुठे बरे शोधावे? आम्हीच तुम्हाला शोधत होतो.''

विचार करा, माझ्यासारख्या नवख्या कलाकाराशी ही अशी प्रस्तावना किती हायसे वाटायला लावणारी, दिलासा देणारी असेल? जी. एन. साहेबांचे ते 'मिलनसार' स्मित माझे एचएमव्हीशी नाते जोडून गेले. एचएमव्हीचा मी नियमित आर्टिस्ट झालो हे तर खरेच पण म्यूझिकवर आयुष्य काढण्याची पहिली पायरी मी एचएमव्ही-मध्ये चढलो. माझी किरवाणी व मिश्रतिलक कामोदमधली पहिली इ.पी., जी.एन. साहेबांनी काढली, १९६२ साली. तबल्यावर महादेवजी इंदूरकर. आणि नंतरही कुठल्या रागातली ते नक्की आठवत नाही. माझ्या यशाचा श्रीगणेशा, सांगितिक भाषेत नांदी आणि उत्तरोत्तर वाढत गेलेल्या यशाचे पहिले ठाम पाऊल जी. एन. साहेबांच्या साक्षीने, त्यांच्या अनुमोदनाने झाले असेच म्हणायला पाहिजे. इतकेच नव्हे, तर त्यामानाने सर्वथा अपरिचित असे संतूर हे वाद्य वैयक्तिक (सोलो) संगीताच्या जोडीने बसवण्यास त्यांचा मोठा हातभार लागला. हे श्रेय जसे नक्कीच त्यांचे तसेच संतूर व शिवकुमार समीकरण प्रचलित होण्यातही ते खूपच अग्रभागी होते असे म्हणावेसे वाटते.

१९६७ साली विजयकिशोर दुबे (प्रोड्युसर, एचएमव्ही) यांच्या आधिपत्याखाली a day in the life of a Kashmiri shephered अशा काहीशा विषयांतर्गत रागमालेची एक तबकडी काढायचे ठरले. भैरव, नटभैरव, पहाडी मिळून सहा रागांचा स्पेक्ट्रम. या तबकडीसाठी बासरीवर हरिप्रसाद चौरासियाजी व हवाईअन गिटारवर ब्रीजभूषण काब्राजींचे आयोजन मात्र जी.


एन. साहेबांचे. परंतु त्यांचे या तबकडीमध्ये फक्त एवढेच योगदान नव्हते. प्रत्येक रागानुरूप अतिशय काव्यात्मक असा, स्क्रीन प्ले लिहावा तशी संहिता जी. एन. साहेबांनी लिहिली होती. Call of the valley या तबकडीचे, त्या संहितेसकट सारे रूपडेच लोकप्रिय झाले. शिवकुमार नावाचा संतूर सर्वतोमुखी झाला. आज, २००९ मध्येही Call of the valley अतिशय लोकप्रिय आहे. किंबहुना या संहितेनुरूप गजानन जहागिरदारांना एक फिल्म काढायची होती. त्या संहितेची एक प्रकारे दादच होती ती. दुर्दैवाने, ही फिल्म मात्र झाली नाही.

जी. एन. साहेब स्वतः एक कलाकार होते. संगीताचे जाणकार होते. याचा फार मोठा फायदा त्या काळात एचएमव्हीचा संग्रह (archives) बनण्याकडे झाला, अगदी विविध प्रकारांनी झाला. ज्या काळात लोकांच्या हृदयावर राज्य करणारे गायक व वादक कलाकार स्टुडिओमध्ये जुन्या पद्धतीच्या मशिन्समध्ये व नंतर त्यामानाने सुधारलेल्या मशिन्समध्ये गायला वा वाजवायला अजिबात तयार नसत, जेव्हा त्यांच्या मनात हे काहीतरी आपल्यापासून चोरले जात आहे की काय अशी संशयग्रस्त अढी असे, त्या काळात कलाकारांना चुचकारून, त्यांच्या पोटात शिरून चांगल्या प्रकारे हळूच फसगंमत करून जे अर्काईव्हज जी. एन. साहेबांनी बनवले त्याला इतिहासात तोंड नाही. त्यांना एक वेगळीच हातोटी होती. भल्या भल्या कलाकारांनाही जी. एन. साहेबांना नाकारणे जमत नसे. अगदी स्त्री कलाकारांना देखील. गौहर, अख्तरीबाई, केसरबाई अशा कलाकारांना गायला लावणे, अगदी बडे गुलामसारख्या गुस्सेवाल्यांना गायला लावणे ही फार कठीण किंबहुना दुरापास्त बाब होती. त्यावेळी जोशीसाहेब त्या जागेवर नसते तर आपण फार मोठ्या कलासंग्रहाला वंचित झालो असतो. त्यांचे पुरोगामीत्व वा दूरदृष्टी यांचे आज आपल्याला पुण्यस्मरण करणे क्रमप्राप्तच आहे. त्यांची एक फार मोठी Humane साईड मी अनुभवली आहे. थिरकवाँसाहेब कसल्यातरी आर्थिक विवंचनेत होते की काय नकळे! जोशीसाहेबांना ते कसे कळले असावे, ठाऊक नाही, पण कुठल्याशा (बहुतेक Belgian) Exhibition साठी बरेचसे noncommercial recording माझ्याबरोबर थिरकवाँसाहेबांना वाजवायला बसवून त्यांनी करवून घेतले आणि पाठवून दिले. थिरकवाँसाहेबांची विवंचना टळली असावी. पण हे करताना कुठे हूँ नाही की चूँ नाही. इतकेच नव्हे, तर अशा प्रचंड कलाकाराची अस्मिताही त्यामुळे दुखावली गेली नाही. कलाकारांच्या पोटात शिरणे हे जोशी–साहेबांना फार छान जमे. स्वतः कलाकार असल्याने कलाकारांची सुखदु:खेच नव्हे तर त्यांचे Tantrums सांभाळणे हे तेच करू शकत असत.

त्यावेळी एचएमव्हीचे मुख्यच होते ते, पण इतर कनिष्ठ कार्यकारी मंडळालाही त्यांनी कधी टेंशनमध्ये ठेवलेले आठवत नाही. सदा हसतमुख व वृत्तीने साधे (unassuming) असल्याने त्यांच्याभोवती वातावरणच मोठे छान असे. सगळ्या ज्येष्ठ व कनिष्ठ सहकारीवर्गाशी त्यांचे फार मित्रत्वाचे संबंध असले पाहिजेत.

यावर्षी त्यांचा शंभरावा जन्मदिवस आहे. त्यांच्या विविध आठवणींच्या फुलांनी आज मीच सुशोभित झालो आहे.

शब्दांकन : **डॉ. यशवंत भागवत**
ई–मेल : yjbhagwat@yahoo.com




ग्रंथाली

ताजे प्रकाशन

**प्रकाशवाट – वंदना करंबेळकर**

वंदना करंबेळकर यांच्या या अनुवादित कथा सकारात्मक दृष्टिकोनातून प्रकट होतात. त्यांतील नायिका सर्वसाधारण जीवनातील कोंडमाऱ्याचे अनुभव घेताना दमदारपणा दाखवतात; त्या ओघात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत जातो.

मूल्य १२५ रुपये । सवलतीत ७५ रुपये
घरपोच ९५ रुपये

# तबलामहर्षी भाई गायतोंडे

कृतार्थ मुलाखतमालेत तबलामहर्षी भाई गायतोंडे यांची मुलाखत २१ फेब्रुवारी २००९ रोजी संपन्न झाली. अमीत दाते यांनी ती घेतली.

दाते म्हणाले- भाई, तुमच्या घरातील ज्येष्ठ व्यक्ती, गुरू यांचे संस्कार तुमच्यावर कसे झाले हे जाणून घ्यायला आम्हाला आवडेल. कला ही व्यक्तीसापेक्ष धरली जाते, पण कला ही इतिहाससापेक्ष आहे, समाजातील स्थित्यंतरालाही ती सापेक्ष आहे. हा जो कलेच्या बाबतीत पाश्चात्य विचार आहे तो आपल्याकडे आहे असं मला वाटत नाही. पंडित कुमार गंधर्व आणि रविशंकर यांनी सामाजिक बांधीलकी लक्षात घेऊन त्या दृष्टीनं प्रयत्न केला. या प्रकारे गेल्या सत्तर वर्षांतला कालखंड भाई गायतोंडे यांनी जवळून पाहिला.

भाई, तुमचा जन्म कणकवलीचा. मला तुमच्या वडिलांची पूर्वपीठिका जाणून घ्यायला आवडेल.

भाई गायतोंडे - माझे वडील डॉक्टर भास्कर गायतोंडे हे एकोणीसशेपंचवीस साली ग्रँड मेडिकल कॉलेजमधून एम.बी.बी.एस झाले. काही दिवस ते हॉस्पिटलमध्ये हाऊस सर्जन म्हणून काम करत होते. त्यांच्या मनात असा विचार आला, की खेड्यामध्ये लोकांना मेडिकल एड. मिळत नाही. म्हणून एकोणीसशेसव्वीस साली ते कणकवलीला गेले, कारण ते एक मध्यवर्ती गाव आहे. त्यांनी तिथं प्रॅक्टिस सुरू केली. त्यामागे असा एक विचार होता, की डॉक्टर झाल्यावर आपली काही कर्तव्यं असतात, आपण जी काही शपथ घेतली आहे ते आपण केले पाहिजे. तिथं आजारी माणूस असेल तिथं ते स्वतःपोचत. त्याकाळी रस्ते नव्हते, गाडी जाऊ शकेल तिथपर्यंत गाडीनं जात आणि त्यापुढे चालत, पोहत, खटारा गाडीनं जात आणि औषधोपचार करत.

त्यांच्या मनात दुसरा असा विचार येई, की 'मी माझ्या तत्त्वांसाठी इथं आलो पण माझ्या मुलांच्या शिक्षणांच काय! म्हणून एकोणीसशेअठ्ठावीस साली त्यांनी कणकवलीत शाळा स्थापन केली. पहिली ते पाचवी असे वर्ग सुरू केले. हेडमास्तर हा ग्रॅज्युएट असला पाहिजे असा नियम असल्यामुळे पहिले हेडमास्तर माझे वडीलच झाले. त्या शाळेला पंच्याहत्तर वर्षं झाली. त्यावेळी शाळाचालकांनी मला बोलावलं होतं. वडिलांनी ज्या पाच वर्गखोल्या बांधल्या होत्या त्या आजही तशाच आहेत. शाळेन ती आठवण अजून ठेवली आहे.

दाते- तुमच्या आईच्या वडिलांनी त्यांना सांगितलं होतं, की तू लंडनला जाऊन एफ.आर. सीएस कर, पण ते कणकवलीतच राहिले.

गायतोंडे- होय. त्याबरोबर वडिलांना संगीताची आवड होती. तसा संगीताचा शौक आमच्या घराण्यातच आहे. माझे पणजोबा घुमट चांगला वाजवत. वडील मेडिकल एज्युकेशन करत होते पण त्याचबरोबर बालगंधर्वांची नाटकं पाहत. 'स्वयंवर' नाटक त्यांनी पंचेचाळीस वेळा पाहिलं. ते तबला आणि हार्मोनियम वाजवत.

दाते- एवढ्या छोट्या गावात कलाकारांचं येणंजाणं कसं असायचं?

गायतोंडे- त्या काळी मोठमोठे कलाकार गावोगाव फिरून आपलं गाणं ऐकवत. काय व्हायचं, की असे गायककलाकार कणकवलीत आले की आमच्या घरी राहायचे. वझेबुवा सुद्धा असेच आमच्याकडे आले होते. एक-दोन दिवस राहिलें की गावातले लोक कार्यक्रमासाठी बोलावत. माझे वडील त्यांना साथ करत. त्यांचा तबलजी असला की वडील पेटीची साथ करत. पेटीवाला असला तर तबल्याची साथ करत.

दाते- वझेबुवा मुक्कामाला असताना एकदा अपरात्री एक अडलेली केस तुमच्या वडिलांकडे आली तो किस्सा सांगा. किश्श्यांना कौतुकाचा मुलामा चढतो आणि कला आणि त्याची सापेक्षता यात विक्षेप येतो असं माझ मत आहे. त्यावेळची सामजिक पार्श्वभूमी काय होती याची कल्पना यामुळे येते. वझेबुवा हे नाव मोठं आहे. त्यांचं परिस्थितीसापेक्ष वागणं कसं होतं याबद्दल समजावं म्हणून हा प्रश्न मी विचारतोय.

गायतोंडे - वझे आमच्या घरी आले. दोन-तीन दिवसांनंतर त्यांचा प्रोग्रॅम ठरला. गाणं सुरू झालं. वडील पेटीच्या साथीला बसले होते. तेवढ्यात एक पेशंट आला व म्हणाला की घरी बाई अडली आहे. माझ्या वडिलांनी लगेच वझेबुवांना सांगितलं की 'मला जायला पाहिजे', वझेबुवा म्हणाले, 'जा बाबा तू!' रात्रीचे अकरा वाजले असतील. वडील गेले ते पहाटे पाच वाजता परत आले. तोपर्यंत वझेबुवा पायरीवर बसून राहिले होते. वडिलांची वाट बघत होते. ते आले तेव्हा बुवा उठले, म्हणाले, 'काय रे बाबा?' वडील म्हणाले, 'बाळ बाळंतीण सुखरूप आहेत' ते ऐकल्यावर बुवांनी त्यांना मिठी मारली. त्यावेळची पद्धत अशी होती की डिलिव्हरी करून आल्यावर आंघोळ केल्याशिवाय कुठे स्पर्श करायचा नाही . म्हणून त्यावर बुवा म्हणाले, 'तू इतकं चांगलं काम करून आला आहेस! आंघोळीनं काय

होणार आहे?' असं होतं त्यावेळचं वागणं आणि गाणं.

दाते– अशावेळी कलाकारांचं मानधन वगैरे डॉक्टरच द्यायचे का?

गायतोंडे– त्यावेळी मानधन म्हणजे पंचवीस रुपये म्हणजे सुद्धा खूप झाले. ते दिले की ते दुसऱ्या दिवशी दुसऱ्या गावाला जात.

दाते– वडील हे तुमचे तबल्यातले पहिले गुरू. लहानपणी तुम्ही पहिल्यांदा कुठे आणि कसं वाजवलं?

गायतोंडे– त्यावेळी कसं होतं, की एस.टी वगैरे नसायची. सगळ्या प्रायव्हेट गाड्या होत्या. स्टँडवर हाकाट्या चालू असायच्या. त्या ड्रायव्हरांचं एक असोसिएशन होतं. त्यांची सगळ्यांची मिळून दरवर्षी सत्यनारायणाची पूजा असायची. त्या पूजेमध्ये क्लासिकल गाणं असायचं. मी त्यावेळी सहा वर्षांचा होतो. वडील दवाखान्यातून आले आणि म्हणाले, 'चल, आपल्याला मालवणला जायचंय'. आम्ही कणकवलीहून मालवणला गेलो. तिथे पूजा होती. मी माडीवर जाऊन झोपलो. खाली गाणं चालू झालं. पूर्वी गावात 'तबलेवाले ' असायचे. 'साथसंगत' असा शब्द तेव्हा वापरला जाई. तेव्हा विचारलं, 'ठेक्याला कोण?' कार्यक्रम चालू झाला, पण तिथं साथीला आलेल्याचा जो ठेका होता तो त्या गवयाला जमेना. तेव्हा आमचा ड्रायव्हर वडिलांकडे गेला आणि म्हणाला, 'भाईला घेऊन येऊ का?' वडील म्हणाले,'ठीक आहे, घेऊन ये.' मला उठवून. उचलून खाली घेऊन आले. एक गादी गुंडाळून तबल्याजवळ ठेवली. त्यावर मला बसवलं, गायकांनी गायला सुरुवात केल्यावर मी ठेका दिला. त्यांना तो आवडला. गाणं व्यवस्थित झालं. त्यावेळी मीडिया नव्हता त्यामुळे फोटो वगैरे नाहीत.

दाते– त्यानंतरचं स्थित्यंतर म्हणजे कोल्हापूर. ते व्हायलाही एक कारण घडलं, ते कोणतं?

गायतोंडे – वडिलांना या सगळ्या त्रासामुळे हार्टअ‍ॅटॅक आला. तेव्हा डॉक्टरांनी सांगितलं की आता तुम्ही खेड्यात प्रॅक्टिस करू नका. म्हणून त्यांनी कोल्हापूर निवडलं. मुंबईला नाही आले. का ते सांगणं कठीण आह, पण मला आता असं वाटतं की ते माझ्यासाठीच होतं.

दाते– कोल्हापूर म्हणजे पूर्वी ते कलापूरच होतं. तिथं आल्यावर तुमचे पहिले गुरू कोण?

गायतोंडे– वडिलांनी कोल्हापूरला प्रॅक्टिस सुरू केली. हळुहळू हेही अनेकांना कळलं की हे डॉक्टर संगीतप्रेमी आहेत. त्यामुळे अनेक कलाकार त्यांच्याकडे तपासून घ्यायला यायचे. अर्थात, वडीलांना त्याचा कधी 'धंदा' केला नाही. एकोणीसशे–चव्वेचाळीस साली माझं तबल्याचं रेग्युलर शिक्षण सुरू झालं. सुधाकर डिंग्रसकर हे निवृत्तीबुवा सरनाईकांचे शागीर्द. ते तबलाही वाजवायचे. कारण निवृत्तीबुवाही तबला वाजवायचे. त्यांच्याकडे माझं शिक्षण सुरू झालं. त्यानंतर मी रमाकांत बेडपकर यांच्याकडे शिकलो. बाबाराम इस्लामपूरकरांचे ते शिष्य होते. अर्थात , तेव्हा घराणं वगैरे काही कल्पना नव्हती, पण माझ्या नशिबानं मला एकच घराणं मिळत गेलं. त्यांच्याकडे मी शिकलो.

त्या काळात बाबुलाल सांगावकर हे कोल्हापुरात होते. मेहबूबखाँसाहेब मिरजकरांकडे शागीर्द होते. ते माझ्या वडिलांकडे यायचे. त्यांनी पहिला पेशकार, नंतर कायदा, नंतर काय काय येतं ते मला एका कागदावर लिहून दिलं. त्यानंतर मी वाजवायला सुरुवात केली. मला प्रेझेंटेशनचा आराखडा त्यांनी दाखवला त्यावेळी मला समजलं की हे भाग आहेत. त्यानंतर असा फार मोठा योग आला, की बाबुभाई रोकडीकर हे त्यावेळचे कोल्हापुरातील मोठे तबलजी, ज्यांनी प्रभातच्या 'गोपालकृष्ण' मध्ये त्यांनी तबला वाजवला आहे, त्यांची दोन-तीन वर्षं शिकवण मला मिळाली.

दाते– अशी परंपरा मिळाली असताना एक घटना अशी घडली ज्यायोगे तुम्हाला बिनीचा तबला ऐकायला मिळाला. ती घटना सांगा.

गायतोंडे– जगन्नाथ पुरोहित ऊर्फ गुणीदास हे देवल क्लबमध्ये होते. आमची पुष्कळदा भेट व्हायची. माझा तबला त्यांनी ऐकलेला होता. पण त्यांना तबला येतो हे आम्हाला माहीत नव्हतं. एकोणीसशेसदतीसमध्ये गोविंदराव टेंबेंच्या बरोबर साथीला तबलजी म्हणून जगन्नाथबुवा गेले होते.

एकदा माझे वडील जगन्नाथबुवांना भेटण्यासाठी म्हणून गेले. पायऱ्या चढून वर जाताना त्यांनी ऐकलं की आत कुणीतरी ठुमरी गातंय आणि त्याची साथ चालली आहे, ती उत्तम आहे. हे त्यांच्या ध्यानात आलं आणि त्यांनी डोकावून बघितलं तर राम देशपांडे गात होते आणि जगन्नाथबुवा साथ करत होते. वडील लगेच क्लबचे सेक्रेटरी बाबुराव जोशी यांच्याकडे गेले. त्यांना म्हणाले, 'हा तबला माझ्या घरात पाहिजे.' दोघेजण जगन्नाथबुवांना भेटले आणि बाबुराव म्हणाले, 'ह्या डॉक्टरांची अशी इच्छा आहे.' बुवा म्हणाले, 'ठीक आहे, मी उद्या येतो आणि सांगतो.' दुसऱ्या दिवशी ते आमच्या घरी आले. मला त्यांनी वाजवून दाखवायला सांगितले. म्हणाले, मी इथं तुला 'वाहवा' म्हणायला आलो नाही. तुला काय येतं ते वाजवून दाखव.' मी तबला वाजवून दाखवला. तो ऐकून ते म्हणाले, 'उद्या सकाळी सहा वाजता देवल क्लबवर ये.' तेव्हापासून ते शिकवण सुरू झालं.

दाते– हा जो एक प्रकारचा यज्ञ असतो तो घडतो कसा? गुरूंनी शिकवलं खरं, पण ते कसं आणि काय शिकवलं?

गायतोंडे– त्यांनी मला सकाळी सहा वाजता बोलावलं. तसा मी बरोबर क्लबवर पोचलो. तेव्हा मी एकोणीस वर्षांचा होतो. त्यांनी प्रथम सुराचा तबला– मोठ्या तोंडाचा

सुरू केला. त्यावेळी लेहऱ्याचं मशीन नव्हतं. त्यांचे एक शिष्य लहरा जोडून बसायचे. माझा सहा ते दहा असे चार तास फक्त अक्षरांचा रियाज व्हायचा. माझं कॉलेजमध्ये प्रॅक्टिकल असेल तर दुपारी तीन ते सात असे रियाज असे. वर्षाचे तीनशेपासष्ट दिवस हे चालायचं. अशी तीन वर्षं फक्त अक्षरांचा रियाज झाला.


दाते– आता हे ऐकून दंतकथा वाटेल.

गायतोंडे– चार-चार तास तेवढा वेळ केशवराव धर्माधिकारी पेटीवर लेहरा धरायचे! गुरू समोर बसलेले असायचे. त्यांच्यासमोर काही बोलायचं नाही. त्याकाळी गुरू-शिष्य यांचं नातं वेगळंच असायचं. आठ वर्षं मी त्यांच्याशी आपण होऊन कधी बोललो नाही. ते सांगतील तेवढं ऐकायचं.

दाते– ते तुम्हाला कधी वाजवून दाखवायचे?

गायतोंडे– नाही. ते एवढे मोठे गुरू होते की नुसत्या इशाऱ्यानं सांगायचे. ते थांब म्हणेपर्यंत थांबायचं नाही. त्यांना समजायचं की मी दमलोय, मग थांबायला सांगायचे. आणि मग तेवढ्या वेळात 'तुझं हे अक्षर चुकलं, ते तिथं नाही लागलं' अशी तासंपट्टी काढायचे. मग परत 'चल' म्हटलं की सुरू. असं तीन वर्षं झालं. त्यानंतर त्यांनी मला एक वही घेऊन यायला सांगितलं. मी वही घेऊन गेलो. त्यांनी स्टोव्ह पेटवला, चहा केला. ते स्वयंपाक फार चांगला करत. आम्ही दोघांनी चहा घेतला. मग म्हणाले, ' लिही'. एकेक कागद काढला. मला लिहून दिले. मी लिहून घेतल की स्वतःकडचा कागद फाडून टाकत असं करत मला सगळं लिहून दिलं. ते स्वतःकडचा कागद का फाडत होते ते मला समजलं नाही आणि मीही त्यांना विचारलं नाही. नंतर म्हणाले, 'भाई, आता हे तुझ्याकडे आहे. मला कधी लागलं तर तुझ्याकडून घेईन!' मला उत्तर आपोआप मिळालं. विचारावं लागलंच नाही. त्यानंतर बंदिशी सुरू झाल्या. मला काही प्रॉब्लेमच झाला नाही.

दाते– थोडासा तांत्रिक प्रश्न आहे.



एखादी बंदिश कशी म्हटली जावी, कशी वाजवायला हवी तो निकास बुवांच्या तालमीमुळे आपसूक झाला, की बुवांच्या नंतरच्या शिक्षणामुळे तुमच्यामध्ये प्रस्फुटित झाला?

गायतोंडे – १९५५ पासून मी मुंबईमध्ये आलो. सोलो वाजवायला लागलो. देविदास स्कूलमध्ये पहिला सोलो वाजवला तेव्हा श्रोत्यांमध्ये अमीर हुसेनखाँसाहेब, अल्लारखाँसाहेब असे मोठेमोठे कलाकार होते. त्यामुळे मोठ्या लोकांशी माझी ओळख झाली. त्यावेळी रियाजाचा तबला असायचा. निकास वगैरे काही नाही. निकास ही पुढची स्टेप आहे.

दाते– त्याआधी बालगंधर्व, बडे गुलामअली खाँसाहेब यांनी समोर बसून तुमचा सोलो ऐकला असल्यामुळे लौकिकार्थाने आणखी सन्मान मिळायची गरजच नव्हती.

गायतोंडे– माझे वडील संगीतप्रेमी होते. त्यांना बालगंधर्व, बडे गुलामअलीखाँ वगैरे लोक भेटत असत. एकदा बालगंधर्व घरी आले होते. सोफ्यावर बसले होते. चहा वगैरे झाला. माझे वडील म्हणाले, 'माझा मुलगा तबला वाजवतो. आपण ऐकावं अशी इच्छा आहे.' ते म्हणाले, 'ऐकू, आलोच आहे इथे!' त्यांनी काय ऐकलेलं होतं आणि हा कॉलेजमध्ये जाणारा मुलगा मला काय ऐकवणार आहे असं त्यांना कदाचित वाटल असेल. माझा तबला सुरू झाला आणि एका मिनिटात बालगंधर्व सोफ्यावरून उठले आणि समोर येऊन बसले. शेवटी म्हणाले, 'हे कोणी रे बाप्पा शिकवलं तुला!'

एकदा थिरकवासाहेब आले होते. माझा तबला सुरू झाला. भाऊराव कुमठेकर लेहव्याला होते. रियाजाचा जोरकस व्यवस्थित होता. खाँसाहेब टेकून बसले होते. माझ्या कायद्याच्या पर्जामध्ये थोडी गडबड झाली. खाँसाहेब एकदम पुढे आले पण काही बोलले नाहीत. नंतर जगन्नाथबुवांनी त्यांना सांगितलं. 'आपका तबला सुनना है.' त्यांनीही सोलो वाजवला. त्यानंतर देवलक्लबला आले तेव्हा जगन्नाथबुवांना म्हणाले. 'इतना तबला दे दिया तूने.'

दाते– जगन्नाथबुवांचं मला एक विशेष वाटतं. पूर्वीची गुरू-शिष्य परंपरा अशी होती की काहीअंशी गुरूची दहशत वाटावी. पण आपल्या शिष्याला नेमकं काय द्यायचं आणि काय पद्धतीनं द्यायचं हे संतुलन न बिघडवता द्यायचं याबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन उदारमतवादी होता. माझ्या शिष्याची कपॅसिटी इतकी असेल तर मी का देऊ नये

आणि ते दिल्यावर त्यातले जे ऋषिमुनी आहेत अशा खाँसाहेबांसमोर जाऊन 'माझ्या शिष्याचा तबला कसा वाटला' असं विचारणं हे मला प्रॅग्मॅटिक वाटतं.

'जगन्नाथबुवा' हा विषय एक पुस्तक होऊ शकेल एवढा मोठा आहे. १९६७-६८ पर्यंत तुमचं शिक्षण जगन्नाथबुवांकडे झालं. म्हणजे सुमारे सोळा वर्षं झालं. १९६८ मध्ये बुवा गेले. त्यावेळी तात्या बाक्रेंनी बुवांबद्दल 'बुजुर्ग'मध्ये छान लिहिलं होत. त्या आर्टिकलच्या शेवटी त्यांनी लिहिलं होत- 'आग्रा गायकीचे फैयाजखाँसाहेब गेले आणि आग्रा गायकीचे आकर्षण गेले. विलायतहुसेन खाँसाहेब गेले, आग्रा गायकीचे संरक्षण गेले. जगन्नाथबुवा गेले, आग्रा गायकीचे भावावगुंठन गेले.

दाते - १९६८ साली बुवा गेले तो तुमच्यावर वज्राघातच होता. एकीकडे तुमचं इंजिनीयरिंगही चालू होतं. आता पुढे काय आणि कसं हा प्रश्न तुम्हाला पडला असेल.

गायतोंडे- १९७० मध्ये मी माझा बिझनेस सुरू केला. माझा नशिबानं त्यावेळी थिरकवाखाँसाहेब मुंबईत आले. एन.सी.पी.एमध्ये लोकांना शिकवण्यासाठी त्यांना आणलं. मी त्यांच्या घरी जाऊन गंडा बांधला. कारण त्याशिवाय त्यांनी शिकवलंच नसतं. थिरकवाखाँसाहेबांचा गंडा बांधला म्हणून लोक माझ्यावर चिडले. म्हणाले, 'तुला जगन्नाथबुवांनी काय कमी दिलं म्हणून तू खाँसाहेबांचा गंडा बांधलास?' मी त्यांना सांगितलं, मला जगन्नाथबुवांनी अगदी भरपूर, आयुष्यभर पुरेल एवढं दिल आहे. पण मला निकास बघायची आहे. ती जवळून बघितल्याशिवाय समजणार नाही. त्यासाठी गंडा बांधलाच पाहिजे. त्याशिवाय खाँसाहेब वाजवणारच नाहीत समोर!'

दाते- ते एकाच पद्धतीचे कायदे, त्याच रचना, तेच नियम तरीही त्यांच्या रचना इतरांपेक्षा रत्तलभर सरस का?

गायतोंडे- काय आहे, मला सगळ्यात आश्चर्य वाटतं ते थिरकवाखाँसाहेबांचं! त्यांना फ्रिक्वेन्सी म्हणजे काय, नोडल पॉईंट म्हणजे काय, अँटिनोड काय आहे, फंडामेंटल फ्रिक्वेन्सी कसली, हार्वोनिक्स कुठलं ह्यातलं काय माहिती होतं? काही नाही. पण त्यांना जे कान दिले होते, जे सूर होते त्यामुळे त्यांनी कुठे चांगलं आहे, कुठे आनंददायक आहे ते शोधून काढलं. त्यावर जी अक्षरं आहेत त्यांच्या जागा फिक्स केल्या. कुठलीही लय असो, ह्या जागेवर हे म्हणजे हेच, त्यामुळे त्यांचा तबला आपल्याला जो वेगळा वाटतो त्याचं कारण हे आहे.

दाते- सी.व्ही.रामन यांनी जो तबल्यावर विचार केला आहे त्याचा अभ्यास तुम्ही केला. तुमचा त्याबद्दल काय विचार आहे?

गायतोंडे- सी.व्ही रामन यांनी असं सांगितलं की तबला हे जगातलं सर्वात सुरेल वाद्य आहे. एक गोष्ट म्हणजे आमचा तबला हे सेपरेट वाद्य आहे. डग्गा बाजूला आहे. दोघांचा एकमेकांवर परिणाम नाही. तानपुऱ्यात एक तार छेडली तर दुसरी व्हायब्रेट होते. त्यामुळे दुसरा स्वर येतोच. इथे तसं नाही. इथे एकच स्वर आहे. कारण ह्याचं जे कन्स्ट्रक्शन आहे ते सेंट्रली लोडेड आहे. कुठलंही वाद्य आघात झाल्यावर जो नाद येईल त्या नादाचे हार्मोनिक्सही त्याबरोबर असतात. आपल्याला फक्त पाच हार्मोनिक्स पाहिजेत. फंडामेंटल प्लस फोर ही हार्मोनिक्स पाहिजेत. म्हणून तबल्याला चाट ठेवावी लागते. ढोलकीला नसते. मृदुंगाची चाटच कापलेली नसते. ह्या गोष्टी सी.व्ही.रामन यांनी विचारपूर्वक मांडल्या. मीही त्यावर एक प्रयोग केला. 'ना' हा शब्द एकाच तबल्यावर तीन तबलजींनी वाजवलेलं ॲनालेसिस केलं.

दाते - थिरकवाखाँसाहेबांचं शिक्षण फारसं झालेलं नव्हतं तरी त्यांचं एवढं परफेक्शन होतं याचं आश्चर्य वाटत. तुमचं १९७३ पर्यंत शिक्षण झालं त्यांच्याकडे त्यानंतर तुम्ही पेणला विनायकराव घांग्रेकरांकडे शिकायला गेलात. त्यांची पुण्यतिथीही तुम्ही तिथं करता.

गायतोंडे- त्रितालाबरोबर इतरही ताल आहेत. विनायकराव हे झपताल आणि अदावताल यांचे बादशहा म्हटले जातात. मी दहा वर्षं त्यांच्याकडे शिकलो.

दाते- १९८६ नंतर तुम्ही लालजींकडे शिकलात, म्हणजे तुम्ही पस्तीस वर्षं शिकलात!

गायतोंडे- ॲक्युअली मी साठ वर्षांपर्यंत शिकलो २००२! मी शिकत होतो. २००२ मध्ये लालजी गेले. हे पंडित वगैरे म्हणणं ठीक आहे. पण खरं म्हणजे मी विद्यार्थी आहे. आता ज्यांच्याकडे शिकावं अशी व्यक्ती नाही. नाहीतर आजही शिकलो असतो.

दाते- थिरकवाखाँसाहेबांच्या तबल्याच्या शैलीचं उदात्तीकरण अनेकजण करतात. आपल्या नॅशनल अर्काइव्हमध्ये थिरकवाखाँसाहेबांच्या शैलीचा एकच तबला होता. त्याच्यानंतर भाईंचा दुसरा! तसा तिसरा तबला नाही.

गायतोंडे- १९९९ मध्ये संगीत नाटक अकादमीनं माझे नॅशनल अर्काइव्हमध्ये रेकॉर्डिंग केलं. तेव्हा पहिल्यांदाच व्हिडीओ शूटिंग झालं. तेव्हा मी एक तास त्रिताल वाजवला आणि अर्धा तास झपताल वाजवला. थिरकवाँ नेक्स्ट जनरेशन, असं ते व्हीडीओ आहे.

दाते- सूरसिंगार संसदचा 'थिरकताल विलास' हा सन्मान भाईंना मिळाला. 'सूरसाधनारत्न' हा किताब १९९३ मध्ये मिळाला. कोकणकला अकादमीचा सन्मान मिळाला. काय आहे, सामान्य माणसाला ही कल्पना नसते की कलाप्रांतातले हे मानसन्मान त्या त्या फील्डमध्ये मोठे मानले जातात. १९९८ मध्ये भाईंना हिंदुस्थानी संगीत कलाकार मंडळ, बंगलोरचा 'नादश्री' सन्मान मिळाला, सर्वात महत्त्वाचा प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'संगीत नाटक' अकॅडमीचा पुरस्कार २००२ मध्ये मिळाला. अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालयाचा मानद संगीताचार्य, कलाश्रीमंडळ पुणे या संस्थेचा

कलाश्री पुरस्कार २००५ मध्ये मिळाला. भारत गायन समाज, पुणेचा 'राम मराठे स्मृती पुरस्कार' २००६ साली मिळाला. आग्रा संगीत कलाकेंद्राचा 'संगीत रत्न पुरस्कार' मिळाला. अशी ही जंत्री खूप मोठी होईल.

भाईंनी आपला व्यवसाय-नोकरी सांभाळून हा छंद जोपासला. त्याबरोबरच संसारही नेटका केला. त्यांचा मुलगा, सून, मुलगी उत्तम उच्चविद्याविभूषित आहेत. मुलगा गोल्डमेडॅलिस्ट आहे. म्हणजे त्याच्याबरोबर 'हे'ही केलं म्हणावं, की ह्याच्याबरोबर 'ते'ही केलं म्हणावं असा पेच पडतो इतका त्यांनी सगळीकडे नेटकेपणा ठेवला.

आता भाईंनी तबला वाजवून दाखवावा अशी त्यांना विनंती करतो.

गायतोंडे- तबल्याला भाषा असते. जसा मराठीतील शब्दांना अर्थ आहे असं आपण म्हणतो, कारण तो अर्थ आपल्याला कळतो. तबला वाजवल्यानंतर त्याची भाषा सर्वांना समजेलच असं नाही. ही भाषेची सुरुवात कशी झाली. मी ७०० सालातलं एक मराठी वाक्य तुम्हाला सांगतो. तेव्हा मराठ्यांना मरहट्टे म्हणत.

'धडमदह, सामलिंगे, सहीरे, अहीमाण कलहसीले थटीणले, कहीले उल्लवीरे तथ्थ मरहट्ट'

ही भाषा त्यावेळच्या लोकांना कळत होती. पण आपल्याला कळत नाही म्हणून ही भाषा नाही का? भाषाच आहे. त्याचा अर्थ असा आहे-

'बळकट, ठेंगणा, सावळा, काटक, अभिमानी भांडखोर, दिले-घेतले असे बोलणाऱ्या मराठ्यास मी पाहिले'

तशीच तबल्याची भाषा आहे. तुम्ही ऐकत जाल तसतशी ती समजेल.

नंतर भाईंनी थिरकवाशैलीतील बिनीचा तबला वाजवून दाखवला.

शब्दांकन : **शर्मिला पिटकर**


ग्रंथाली

## योगीराज बागूल यांची दोन पुस्तके




मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये
घरपोच १७० रुपये

## पाचट

**योगीराज बागूल**

ऊसतोडकरी साखर कारखान्याच्या आश्रयाने राहतात. कामाचे हंगामी स्वरूप आणि असंघटित वर्ग यांमुळे त्यांच्या व्यथावेदनांकडे समाजाचे लक्ष वेधले जात नाही. हे पुस्तक ही या लक्षावधी कामगारांची कैफियतही होते...

## आठवणींतले बाबासाहेब

**योगीराज बागूल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात आलेल्या नऊ व्यक्तींनी सांगितलेल्या त्यांच्या आठवणी. त्यांमधून बाबासाहेबांचे एक आगळेवेगळे दर्शन होते.




मूल्य ३०० रुपये
सवलतीत १५० रुपये
घरपोच १७० रुपये

# एक अवलिया

## मनोज आचार्य

नेहरू सेंटरमधील प्रदर्शन हॉलमध्ये प्रवेश करताक्षणी माझ्या अस्तित्वाला क्षणार्धात प्रकाशमय उजाळा लाभला. कारण हॉलमधील प्रदर्शित प्रत्येक छायाचित्र प्रकाशझोतात न्हाऊन निघालेलं! त्या प्रकाशाचा किरण थेट माझ्याही हृदयात आरपार घुसला व माझ्या डोळ्यांना त्याचक्षणी दिव्यदृष्टी लाभावी असं काहीसं झालं. त्याचबरोबर रंगांचा एक प्रकाशमय पटल विलक्षण वेगानं उलगडत जाऊन अलगद उकलणारा रंगोत्सव डोळ्यांसमोर उभा राहिला. मनात विचार आला, खरंच! एखाद्या मनस्वी, प्रतिभावंत छाया-चित्रकाराला त्याच्या कॅमेऱ्याच्या लेन्समधून निसर्गाचा जो साक्षात्कार होतो तो सामान्य माणसापेक्षा निश्चितच अलौकिक दृष्टी देणारा असतो, म्हणूनच तो निसर्गात जेव्हा यथेच्छ भटकंती करतो, त्यावेळी आपल्या प्रतिभेनं शक्यतेच्या पलीकडील काही वेगळं शोधण्याचा त्याचा प्रयत्न असतो. त्यातून मग जे आविष्कृत होतं, त्याला जो कमालीचा अलवारपणा लाभतो त्याला तोड नसते.

सी.आर.शेलारे हा असाच एक मनस्वी छायाचित्रकार. त्यांचं प्रत्येक छायाचित्रं आपल्याला वर म्हटल्याप्रमाणे अनुभूती देतं. अमरावती जिल्ह्यातील मांजरीमासला यासारख्या खेडेगावात, एका शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलेले शेलारे बालपणापासूनच निसर्गाशी एकरूप झालेले. त्यामुळे निसर्गाची बदलती रूपं अवलोकणं, त्यातील रंगांच्या, रूपांच्या, छाया-प्रकाशांच्या, सूक्ष्म-अतिसूक्ष्म हालचालींच्या विविध छटांतील सौंदर्य टिपून घेणं हा त्यांचा सहजधर्म झाला. कदाचित त्यातूनच शेलारेंचं छायाचित्रकाराचं मन आकार घेत होतं; परंतु हवा तसा स्वतःचा सूर अद्याप सापडला नव्हता. तो सापडला तरी ते समजण्याचं त्यांचं वय नव्हतं.

त्यांचं घर कलावंतांचं होतं असं नव्हे, पण कुठेतरी घरातील प्रत्येकात कला निश्चितच दडलेली होती. असं त्यांना आज मागेवळून पाहताना वाटतं. वडिलांचं उदाहरण देताना ते म्हणतात, माझे बाबा शेतातल्या कापसाचे तास काढायचे ते पाच कि.मी.अंतराचे. कोणाला हे खरंही वाटायचं नाही पण हे सत्य होतं. हा पाच कि.मी अंतराचा तास अस्सा सरळ काढायचे की त्यावेळी माझ्या बालमनाला आश्चर्य वाटायचे की आपल्याला पाटीवर साधी सरळ रेघ काढताना त्रास पडतो आणि बाबा तर एवढ्या लांबीचा तास तोही एका सरळरेषेत काढतात कसा? मला त्यावेळी बाबांचं फार कौतुक वाटायचं. मी त्यांचं ते काम तासन्‌तास कंटाळा न करता पाहत राहायचो.

'मोठ्या भावाला चित्रकलेची आवड होती. तो देखील ज्या सहजतेनं चित्रं काढायचा ते पाहताना भान हरपून जायचं. त्याचं बघून मग मीही चित्रं काढण्याचा प्रयत्न करायचो. जंगलात भटकण्याची सवय मला खूप होती, पण भटकताना तिथल्या निरनिराळ्या आकाराच्या, रंगांच्या, पानांनी, फुलांनी झाडाच्या आकारांनी, लहान-मोठ्या किटकांनी, फुलपाखरांनी मला नेहमीच बांधून ठेवलं. या साऱ्यांतून मला एक विलक्षण अननुभूत आनंद मिळायचा. त्याची जाणीव मला त्या वयातही व्हायची.'

शेलारेंच्या अंतर्मनात असे छोटे-छोटे वाटणारे, पण कलावंताची ऊर्मी जागृत करणारे प्रबल अनुभव त्या बालवयात एकत्र येत होते आणि त्यांच्यातील जात्याच असणाऱ्या निसर्गदत्त प्रतिभेला नवसत्य व



नवसौंदर्यांची जोड मिळत होती. आज जेव्हा आपण त्यांची छायाचित्रं पाहतो, तेव्हा त्यांच्या चित्तवृत्ती हलवून सोडण्याचं सामर्थ्य त्या साऱ्या अनुभवांत खात्रीनं होतं.

या साऱ्या भावानुवांबरोबरच एकीकडे शालेय शिक्षणही होत होतं, पण निव्वळ ते घेणं क्रमप्राप्त होतं म्हणून! खरी ओढ तर निसर्गसौंदर्य आकंठपान करण्याचीच होती. एकेक इयत्ता पास होत होत अकरावीत आल्यानंतर मात्र, त्यांनी वडिलांकडून पाचशे रुपये घेऊन एक कॅमेरा विकत घेतला. आता फक्त यथेच्छ भटकायचं आणि त्या कॅमेऱ्याद्वारे काहीतरी वेगळं करून दाखवायचं हेच मनाशी ठरवून त्यांनी आपली भटकंती सुरू केली. सुरुवातीला माणसांच्या चेहऱ्यांचं आकर्षण होतं. म्हणून त्यांनी तशी छायाचित्रं काढली. ती प्रत्येकाच्या पसंतीस उतरू लागली. त्यातून त्यांनी एक स्टुडिओ सुरू केला. त्यात थोडी कमाई झाल्यानंतर आणखी एक चांगला कॅमेरा घेतला. त्याद्वारे निसर्गातील ज्या ज्या गोष्टी त्यांना आर्टफॉर्ममध्ये जाणवल्या त्या त्या ते क्लिक करत गेले. ते करताना ज्याचं छायाचित्रं काढत ते चांगलंच असणार याची त्यांना खात्री असायची. हे सारं करताना तुम्ही रचनेचा विचार करायचात का? असं विचारलं तर ते इतक्या निरागसपणे उत्तर देतात. 'अहो, आपल्या आजूबाजूला अनेक फ्रेम्स असतात. त्या प्रत्येक फ्रेममध्ये खूप काही असतं. आपण त्यातलं काय क्लिक करतो त्यावर सारं अवलंबून असतं. मी छायाचित्रं काढताना रचनेचे नियम वगैरे कधीच विचारात घेत नाही. मात्र क्लिक करण्या-आधी बारकाईनं एकदा न्याहाळतो. बसं इतकंच. या निसर्गानं मला बालपणापासून इतकं काही शिकवलं आहे की मानवनिर्मित कलेच्या नियमांच्या चौकटीपलीकडे जाऊन मी सौंदर्यानुभव घेत असतो.' यावेळी मला बहिणाईंची प्रकर्षानं आठवण झाली व प्रत्येक ठिकाणी शिक्षणच उपयोगी पडतं असं नाही हे पटलं. काही माणसं निसर्गदत्त असं काही घेऊन आलेली असतात की त्यांच्या कोणत्याही कृतीला एक अलौकिकत्व प्राप्त झालेलं असतं. ते त्यांच्याजवळ असणाऱ्या दृष्टीमुळे.

शेलारेंना भविष्यातही फोटोग्राफीच्या जगात काही करून दाखवण्यासाठी नवनवीन तांत्रिक गोष्टींचा अभ्यास करावा असं वाटत नाही. ते म्हणतात, 'निसर्गानं माझी वृत्ती मूलतःच प्रयोगशील बनवली आहे. त्यामुळे मानवनिर्मित अनेक कक्षा ओलांडून त्याच्या पलीकडे असणाऱ्या अनंत सौंदर्यविश्वाचं दर्शन मला नेहमीच घडत असतं. त्यामुळे माझ्या हातून जी कृती घडते ती मला आणि दुसऱ्याला समाधान देतेच.'

शेलारे महाराष्ट्रातील कोपरान् कोपरा फिरले. त्यात त्यांनी समुद्रकिनारे, पक्षी, प्राणी, पानं, फुलं, माणसं व त्यांच्या अनेक जाती, घरांचे प्रकार, गड-किल्ले सारं सारं आपल्या कॅमेऱ्यानं टिपलं. ते टिपताना नैसर्गिक छाया-प्रकाशाच्या साम्य-भेदानं छायाचित्रात त्यांनी जी नाट्यमयता आणलीय ती निश्चितच लक्षणीय आहे.

मधल्या एका काळात त्यांनी शेती देखील केली. वेगवेगळी पिकं घेतली. ती घेत असताना त्यावर हल्ला करणाऱ्या किटकांचा, अळ्यांचा खूप बारकाईनं अभ्यास केला. त्याची टिपणं काढली. छायाचित्रं काढली. अमरावती विद्या-पीठाच्या बायोलॉजी व झूऑलॉजी विभागाने त्याचं विद्यार्थ्यांसाठी प्रदर्शनही भरवलं. त्यात ते लोकांसमोर अधिक आले. पुढे त्यांनी स्वतंत्रपणे अनेक प्रदर्शनं भरवली. ज्यात फोटोग्राफीच्या क्षेत्रातल्या अनेक नाम-वंतांकडून त्यांना भरभरून दाद मिळाली व फोटोग्राफीच्या तांत्रिक गोष्टीचा काहीही अभ्यास नसताना इतकी अप्रतिम छायाचित्रं पहिल्याच टेकमध्ये काढल्याबद्दल आश्चर्यही व्यक्त केलं. शेवटी अस्सल कलावंताची कोणतीही कलाकृती नवा अर्थ देत, नवे जीवन देत समग्र आकृतीचा प्रवाह पुढे नेते. असा अनुभव आस्वादकाला आस्वादकाळी येत असेल, तर ती खऱ्या प्रतिभेनं साकारलेली कलाकृती असते हेच खरं.

शेलारेंचं खास वैशिष्ट्य म्हणजे या अवलिया कलावंताला असलेलं जबरदस्त सामाजिक भान. जे त्यांच्यातल्या माणूस-पणाची साक्ष क्षणोक्षणी देतं. त्यातलं एक महत्त्वाचं उदाहरण इथं देणं गरजेचं आहे. एकदा ते भटकंती करताना चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील, वणी भागातील कोळशाच्या खाणीत पोचले आणि तिथल्या प्रदूषित वातावरणाने तिथे काम करणाऱ्या माणसांचं जीवन उद्‌ध्वस्त होताना पाहून प्रचंड अस्वस्थ झाले. त्यांनी त्याचवेळी निश्चय केला याला वाचा फोडायची आणि ते त्या दृष्टीनं कामाला लागले. तिथल्या लोकांना भेटून या लोकांचं संपूर्ण जगणं त्यांनी रोज न्याहाळायला सुरुवात केली. ते कोणकोणत्या गोष्टींना किती कष्टानं तोंड देत आहेत हे जाणून घेतलं आणि सारं आपल्या कॅमेऱ्यात बंदिस्त करून, त्या त्या जिल्ह्यात कलेक्टर ऑफिससमोर त्या छायाचित्रांचं प्रदर्शन भरवलं. येणारा-जाणारा त्या छायाचित्रांनी हादरून जात होता. सरकारी अधिकारीदेखील जागे झाले. त्यांनी शेलारेंना त्या लोकांसाठी नक्की काही करू असं आश्वासन दिलं. थोड्याफार प्रमाणात काही केलंदेखील. आज जरी त्या खाणकामगारांची स्थिती जैसे थे असली तरी शेलारेंसारख्या एकांड्या शिलेदारानं दुःखाला वाचा फोडण्याचं जे काम केलं ते काही थोडं नाही. माणूसपणाची कास धरून चालणाऱ्या या खऱ्याखुऱ्या कलानिष्ठ कलाकाराला आजवर अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी भूषवलं असलं, तरी हा अवलिया साधं, सरळ जीवन जगण्यातच धन्यता मानतो.

**– मनोज आचार्य**
२०३/ बी नरसिंह स्मृती, गावठाण-
विरार(प.), विरार- ४०१ ३०३
मोबाईल : ९८२१३७८०७८
E-mail : manoj.acharya90@gmail.com

# बिझिनेस स्कूल्समधून प्रशिक्षित होणारे (तथाकथित) तज्ज्ञ

**प्रभाकर नानावटी**

या जगाच्या पाठीवर करत असलेल्या दुष्कृत्यांसाठी जबरदस्त शिक्षा देणारा एखादा चित्रगुप्त खरोखर असल्यास, ज्यांच्या नावापुढे एम.बी.ए. ही तीन अक्षरे आहेत त्यांचीच नावे चित्रगुप्ताच्या यादीत आता झळकली असती. ज्या प्रकारे या व्यवस्थापनतज्ज्ञांनी गेली दहा-पंधरा वर्षे धुमाकूळ घातला आहे त्याला तोड नाही. केवळ शब्दांचे बुडबुडे उठवणारे, सर्व नीती-नियमांना गुंडाळून ठेवणारे, खाल्ल्या अन्नाला न जगणारे हे तथाकथित व्यवस्थापनतज्ज्ञ व तज्ज्ञ सल्लागार, इतर कुठल्याही क्षेत्रातील तज्ज्ञांपेक्षा आपल्यासमोर आर्थिक मंदीचे अरिष्ट उभे करण्यास जबाबदार आहेत. बिझिनेस मॅनेजमेंटची पदवी म्हणजे गलेलठ्ठ पगार देणारा, नको तेवढ्या सोयी-सवलतींची लयलूट करणारा, ऐषारामी व चैनीच्या जीवनशैलीसाठी मिळालेला मुक्त परवानाच आहे अशी समजूत करून घेतलेल्यांनी जागतिक आर्थिक घडीची वाट लावली. इतर उद्योगांतील हजारो-लाखो तरुणांना कफल्लक करून टाकले. त्यांच्या नोकऱ्या गेल्या. बेरोजगारी वाढली. उत्पादनव्यवस्थेला खीळ बसली. बांधकाम व्यवसाय खड्ड्यात रुतून बसला. करोडोंचा रोजगार बुडाला. त्यामुळे या आर्थिक अरिष्टातून बाहेर पडण्यासाठी जगातील सर्व देशांना जबरदस्त किंमत द्यावी लागत आहे. ज्यांच्या बुद्धिमत्तेतर विश्वास ठेवला ती बुद्धिमत्ताच तकलादू व बिनभरवशाची निघाली. एम.बी.ए. म्हणजे Master of Business Administration नसून ते Mediocre But Arrogant वा Mighty Big Attitude किंवा Management by Accident असे म्हणण्याची वेळ आली आहे. संपूर्ण औद्योगिक व्यवहारांना रसातळाला नेऊन ठेवलेल्या या महाभागांना जगात आजपर्यंत प्रचलित वा अप्रचलित असलेली अत्यंत क्रूर शिक्षा दिली तरी ती अपुरी ठरेल!

मेरिल लिंच या आर्थिक व्यवहाराच्या कंपनीचे सर्वेसर्वा स्टॅन ओ नील, जॉन थाइन व अँडी हॉर्न हे संचालक जगप्रसिद्ध हार्वर्ड बिझिनेस स्कूलचे एकेकाळचे मुख्यस्थ होते. याच स्कूलमधून पदवी घेऊन उच्चपदापर्यंत पोचले होते. परंतु स्वत:च्या कंपनीचीच त्यांनी संगनमताने विल्हेवाट लावली. जगाला वेगळेपण देणाऱ्या नेतृत्वाला प्रशिक्षित करणारी (To educate leaders who make a difference in the world) असे बोधवाक्य मिरवणारी हार्वर्ड बिझिनेस स्कूल कुठल्या वेगळेपणाची भाषा करत आहे कोण जाणे? मुळातच अशा व्यवस्थापन शिक्षण संस्थांना आपापल्या देशात काय घडत आहे याच्याशी सुतराम संबंध नसतो. सामाजिक बांधीलकी नसते. कॉर्पोरेट व्यवस्थापनांच्या नावाखाली कॉर्पोरेटचाच फक्त फायदा बघावा (व स्वत:ची तुंबडी भरावी), यासाठी कुठलेही गैरमार्ग वापरले तरी चालतील हेच शिक्षण इथे दिले जात असावे. शेवटी, कॉर्पोरेट व्यवस्थेलाच गिळंकृत करण्यापर्यंत त्यांची मजल गेली व इतर सर्वांवर अरिष्ट कोसळले आणि ज्यांच्यामुळे हे झाले ते सर्व नामानिराळे राहिले.

१९९० च्या सुमारास ही स्कूल एन्रॉन या कुप्रसिद्ध कंपनीची भरपूर स्तुती करत होती. एन्रॉनमध्ये त्याकाळी मुख्य कार्यकारी संचालक, जेफ स्किलिंगपासून खालपर्यंतचे सर्व मॅनेजर हार्वर्ड स्कूलमधूनच प्रशिक्षित होऊन बाहेर पडलेले होते. एन्रॉन व्यवस्थापनाला वस्तुपाठ म्हणून पाठ्य-क्रमामध्ये समावेश केला होता. एन्रॉन अधोगतीच्या मार्गावर जात आहे याची पुसटशी कल्पना या स्कूलला आली नाही. पाठ्यक्रमात एन्रॉनला उच्च स्थान देत असताना या कंपनीच्या नीतीबाह्य धोरणांबद्दल या स्कूलला ना खेद ना खंत! सर्व बाजूंनी कीड लागलेल्या एन्रॉनच्या अध:पतनानंतर जणू काहीच घडले नव्हते या तोऱ्यात सर्व पाठ्यक्रम बदलून स्कूल मोकळी झाली.

रायॅल बँक ऑफ स्कॉटलंडला (RBS) बुडवण्यात याच स्कूलच्या मॅनेजरचा हात होता. संघटनकौशल्य व वर्तणूक हे विषय शिकवणारे जोल पोडोनी या तज्ज्ञ प्राध्यापकाला RBS मधील त्याचे सहकारी फ्रेड गुडविनबद्दल गर्व होता. RBS चे उद्योग प्रारूप हे एकमेवाद्वितीय आहे असाच उल्लेख ते करत. २००३ च्या स्कूलच्या नियतकालिकात याविषयी केस स्टडीचा लेख लिहून RBS ची वारेमाप स्तुती केली. परिश्रम, शिस्त, फोकस, ग्राहकहित यांवर भर देत RBS च्या चौकटीत या गोष्टींकडे सातत्याने कसे लक्ष दिले जाते याची भलामण केली होती. RBS जेव्हा नॅटवेस्ट या बँकेला गैरमार्गाने गिळंकृत करत होती तेव्हा हे एक उत्कृष्ट पाऊल आहे असे उद्गार काढले! गुडविन यांनी तर याच्याही पुढे जाऊन, नेतृत्वाने ग्राहकांच्या मनावर व हृदयावर कब्जा करू शकणारी मूल्यव्यवस्था


निर्माण करावी असे विधान केले होते. RBS ने काही केले तरी त्याचे उदो उदो करणारे लेख छापून येत होते. वेबसाइटवर अभिनंदनांचा धो धो पाऊस पडत होता. हे सर्व आता वाचताना चीड येते. RBS ची तरफदारी करताना बँकेची विश्वासार्हता, रोकडपत, भांडवली रचना, नीतिनियमांची चाड रसातळाला जात होती. तरीसुद्धा या तज्ज्ञ म्हणवणाऱ्यांना त्याचे काही वाटले नाही? प्रत्येक गोष्टीचा नको तितका कीस काढत बसणारी ही मंडळी याच प्रसंगात मूळ गिळून का बसली, हे कोडे सुटत नाही. वाचकांची दिशाभूल करताना लेखणी का अडखळली नाही?

या गोष्टी आताच घडत आहेत का? नाही. यालापण दीर्घ परंपरा आहे. १९८० मधील घटनांची उजळणी केल्यास हे घातक चक्र पुन्हा मूळपदावर आलेले लक्षात येईल. हार्वर्डमधून शिकून आलेले मॅनेजरच अंतर्गतरीत्या परस्परांमध्ये समभाग विकून गब्बर होत होते. वॉल स्ट्रीट व स्टॉक एक्स्चेंजला सळो की पळो करून सोडत होते. म्हणूनच शिकाऊ मॅनेजरना औद्योगिक नीतिमूल्यांचे धडे द्यावेत म्हणून अनेक उद्योजकांनी या स्कूलला करोडो डॉलरची देणगी दिली. परंतु परिस्थितीत अजिबात बदल नाही. दरवर्षी केवळ ९०० मॅनेजरना पदवी देणाऱ्या या संस्थेला अलिकडेच शंभर वर्षे पूर्ण झाली. हार्वर्ड स्कूलचे डीन, जो लाइट, यांनी यानिमित्ताने आयोजित केलेल्या एका समारंभात जगावर कोसळलेल्या आर्थिक संकटाशी आपला काही संबंध नाही याच थाटात भाषण दिले. गेल्या १५ वर्षांत बदलत असलेली व दिवसेंदिवस नाजूक होत चाललेली आर्थिक स्थिती, संकट कोसळल्यास राजकीय परिस्थिती मात करू शकेल हा भाबडेपणा आणि आर्थिक सुरक्षा, त्याची बाजारपेठ व आर्थिक संघ-संस्था यांच्यातील निर्नायकी अवस्था इत्यादींचा उल्लेख करताना, आपल्याकडूनही चूक झाली याचा लवलेशही त्यांच्या भाषणात नव्हता. जागतिक अर्थव्यवस्था भरकटत जात आहे, भांडवली व्यवस्थेचे आधारस्तंभ भराभर कोसळत आहेत, एकमेकांवर दोषारोप करण्यातच सर्व मग्न आहेत इत्यादी गोष्टी माहीत असूनसुद्धा आपण त्या गावचेच नाही असा आविर्भाव त्यांच्या भाषणात होता. झाल्या गोष्टींची जबाबदारी स्वीकारण्या-एवढा समंजसपणा त्यांच्यात नव्हता. भाषण वाचताना एम.बी.एं.नी घातलेला आतापर्यंतचा गोंधळ पुरेसा नाही का असे वाटू लागते.

डॉक्टर वा इंजिनीअर यांनी अशा प्रकारच्या घोडचुका केल्या असत्या तर संपूर्ण समाज व शासनव्यवस्था त्यांच्यामागे हात धुऊन लागल्या असत्या. मेडिकल व इंजिनीअरिंग शिक्षणसंस्थांना टाळे ठोकले असते. परंतु एम.ए.बी. मॅनेजरांनी केलेली चूक मात्र क्षम्य ठरते. आर्थिक अरिष्टानंतर तरी सर्व संबंधितांचे डोळे उघडतील का याबद्दल अजूनही शंका आहे. आपल्या देशातील बिझिनेसचे धडे देणाऱ्या आय.आय.एम. या संस्था जागतिक घडा-मोडीमधून काही शिकतील का, हे अजून गुलदस्त्यातच आहे. अजून काहीच घडले नाही या तोऱ्यातच त्यांच्या प्रवेश परीक्षा जोमाने चालू आहेत. भरमसाठ फिया घेतच आहेत. या संस्थांच्या आवारात कॅंपस इंटरव्ह्यूसाठी कुणीही येत नसले तरी काही फरक पडत नाही असे प्रेस स्टेटमेंट देऊन ते मोकळे होत आहेत.

मायक्रोसॉफ्टचे बिल गेट्स, गूगलचे लॅरी पेज व सर्जी ब्रिन, डेल कंपनीचे मायकेल डेल, रिचर्ड ब्रॉन्सन, (आपले खास!) लक्ष्मी मित्तल इत्यादी उद्योजकांनी विसावे शतक घडवले. आश्चर्य म्हणजे यांपैकी कुणाकडेही एम.बी.ए. ही पदवी नाही. तरीसुद्धा अजूनही एम.बी.ए. पदवीचे वेड गेले नाही. बिझिनेस शिकवू पाहणाऱ्या शिक्षणसंस्थांत अजूनही भर पडत आहे. हे सर्व पाहता, अशा वेळी बिझिनेस शिक्षण हे केवळ वेळेचा अपव्ययच नव्हे तर अर्थव्यवस्थेला लागलेली कीड आहे असे म्हटल्यास हरकत का असावी? या प्रकारच्या संस्थांकडून लाखो तरुणांच्या भविष्याशी जीवघेणा खेळ खेळला जात आहे. नीतिमत्ता उधळली जात आहे. यातून आपण काहीच शिकणार नाही का?

**– प्रभाकर नानावटी**
E-mail : pkn.ans@gmail.com




ताजे प्रकाशन

व्यवस्थापन शास्त्रामधला
भारतीय प्रयोग

# सुखंटाचे फुलपाखरू

**डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले**

मूल्य १२० रुपये । सवलतीत ७० रुपये
घरपोच ९० रुपये

# लीपीचे प्रमाणीकरण म्हणजे काय?

(वेलांट्या ‘ ि ’ अशा, अुकार ‘ ु ’ असे आणी स्वर-अक्षरे ‘अ, आ, अी, अीं, अु, अू, अे, अै, अॅ, आॅ, ओ, औ’ अशी आहेत.)

अींग्रजीतील 'script' याचा अर्थ 'written letters' असा आहे. अींग्रजीचा लेखन प्रवास 'A ते Z' अशा २६ letters च्या script मधुन होतो. 'script' शाअीने कागदावर चीन्हे अुमटवीते. ‘लीपी’ म्हणजे केवळ शाअीने अुमटवीलेली कागदी चीन्हे नव्हेत. अींग्रजीतील script या शब्दातुन, शाअीने कागदावर अुमटवीलेल्या चीन्हांचाच केवळ वीचार होतो. मराठीतील ‘लीपी’ शब्दाचा अर्थ केवळ तेवढ्यापुरताच मर्यादीत नाही. हा महत्त्वाचा फरक लक्षात आल्या-शिवाय आपण ‘प्रमाणीकरण’ कशाचे करत आहोत तेच कळणार नाही. ‘लीपी’त काय असते ते आपण पाहु.

‘लीपी’च्या लीखीत चीन्हांतुन (script), ‘अुच्चारातील ध्वनी अेकक’ (syllable) जाणता आला की ‘अुच्चार’ (pronunciation) साधता येतो. सर्व मानवी भाषांना हा नीयम लागु पडतो. ‘हवेवर ओठांनी लीहावे तसे कागदावरील शाअीला बोलता आले पाहीजे’, हे मानवी भाषेच्या ‘लीपी’चे सुत्र ठरते. ‘अुच्चारीत ध्वनी-अुर्जेचे’,‘लीखीत स्वरुपातील प्रकाश-अुर्जेत’ रुपांतर करण्याचे काम ‘लीपी’ करते.

लीखीत शब्दात, ‘अुच्चार ध्वनीला दीलेले <u>कागदी चीन्ह</u>’, ‘लीखीतपणातील <u>ध्वनी अेकक</u>’ आणी ‘लीखीतपणातुन सुचवलेला <u>अुच्चार</u>’ असे तीन महत्त्वाचे भाग असतात. या तीन भागांना अेकत्रीत करण्याची क्षमता ज्यात आहे त्याला ‘लीपी’ म्हणतात. आजवर जर असे मानले जात नसेल तर यापुढे तसे मानावे, कारण त्याशीवाय ‘लीपी’च्या ‘प्रमाणीकरणातील’घटक कळणार नाहीत.

अींग्रजी भाषेच्या लीपीचे, 'script'(चीन्हे), 'syllable'(Is a part of a word usually pronuced as a unit= अुच्चार ध्वनी अेकक = ‘अक्षर’) आणी 'pronunciation'(utter, say or speak correctly= अुच्चार) असे तीन भाग पडतात. अींग्रजी भाषेतले 'script' ‘बघुन’, त्यातील 'syllable आणी pronunciation' अुमगत नाही. 'syllable' आणी 'pronunciation' साठी अींग्रजीला डीक्शनरी अत्यावश्यक ठरते (अुदाः WORD:- abandon, SYLLABLES:- a|ban|don, PRONUNCIATION:- ə ban' dən). ‘सर्वात जास्त खपाचे अींग्रजी पुस्तक ‘डीक्शनरी’ का?’ आणी ‘‘डीक्शनरी’ या शब्दाला अभीप्रेत असणाऱ्या ‘शब्दकोषाची’ गरज मराठीला का नाही?’, हे यातुन कळते.

'Spelling bee' हा ‘शब्दांचा खेळ’ मराठीतुन खेळताच येत नाही अीतकी मराठी भाषा श्रेष्ठ ठरते!

प्रत्येक अुच्चाराला ‘सुरवात’, ‘शेवट’ आणी त्यामधला ध्वनीचा प्रवास असतो. अुच्चाराच्या ‘सुरवाती’च्या आधी आणी ‘शेवटा’ नंतर वीराम आला तरच अुच्चाराची वीभक्तता आणी तटस्थता कळते. त्यामुळे ‘दोन वीरामांच्या कोंदणात असलेल्या ध्वनीला अुच्चार म्हणतात’, अशी ‘अक्षर अुच्चाराची’ व्याख्या करता येते. ‘अक्षर अुच्चारात’ ध्वनीचे सातत्य टीकवले जाते. अक्षर ‘अेकजीव, सलग आणी संलग्न’ अुच्चार-ध्वनी असतो.

‘वीराम’ हाही ध्वनीचाच घटक ठरतो. ‘अवधी, वीभक्तता, अंतर, शांतता’ अशी वीरामाची बरीच रुपे आपण संवादातुन वापरतो. त्यामुळेच ‘संवाद-ध्वनींच्या कागदी चीन्हांत’ ‘वीरामांचाही’ (empty space, period, gap, margin चा) समावेश होतो. ‘वीरामचीन्हांचे’(! : , ; ‘ ‘‘. .... वगैरे) प्रमाणीकरण, याचे आता जागतीकीकरण झाले आहे! त्यामुळे ‘ध्वनीला दीलेले कागदी चीन्ह’ यांचे त्या त्या भाषेपुरते ‘प्रमाणीकरण’ साधताना ‘वीराम चीन्हांचे प्रमाणीकरण’ हा थोडा वेगळा वीषय ठरतो. ‘:’ हे चीन्ह अींग्रजीत letter ला चीटकुन तर मराठीत ते अक्षरापासुन दुर लीहावे लागते, अन्यथा मराठीत त्याचा ‘वीसर्ग’ असा अर्थ होतो. ‘वीरामचीन्हांसारखीच’ चीन्हे ‘वीराम-चीन्हांच्या स्थळांच्या जागी, वेगळ्या अर्थासाठी वापरली जाअु नयेत, हे प्रत्येक भाषेने कटाक्षाने पाळणे गरजेचे ठरते.

‘<u>चीन्हे</u>’, ‘<u>अक्षर</u>’ आणी ‘<u>अुच्चार</u>’ असे तीन महत्त्वाचे भाग मराठी ‘लीपी’त असतात. लीपीच्या ‘प्रमाणीकरणासाठी’, त्या प्रत्येकाचा ‘तटस्थपणे’ आणी ‘संयुक्तपणे’ वीचार होणे अगत्याचे आहे. अेका ‘<u>अक्षराला</u>’ अेक ‘<u>चीन्ह</u>’ अशा मांडणीतुन मराठी लीपीची मांडणी व्हायला हवी. त्यासाठी मराठीतील ‘<u>चीन्ह</u>’,‘<u>अक्षर</u>’ आणी ‘<u>अुच्चार</u>’ अीथुन ‘प्रमाणीकरणाची’ सुरवात करणे योग्य ठरते.

संस्कृत भाषेच्या अवाजवी संसर्गाने मराठीच्या या तीन्ही भागांवर चुकीचा, अक्षम्य आणी वीपरीत परीणाम झाला आहे. मराठीने देवनागरीत राहुन, जास्तीतजास्त परंपरा जपत, आवश्यक ते बदल घडवणे गरजेचे आहे. मराठीच्या अशा वीकासाच्या मार्गात ज्या ज्या गोष्टींचे अडथळे येतात, त्यांचा समुळ नाश करणे योग्य ठरते.

सर्वांनी या चर्चेत सामील व्हावे अशी वीनंती आहे. मराठीचा मराठीपणातुन मराठीसाठी वीचार करणे आवश्यक आहे.

**– शुभानन गांगल**

टेलीफोन : ९१-२२-२६२०१४७३

मोबाअील : ९८३३१०२७२७

वेबलींक : http://shubhanangangal.wetpaint.com/

अीमेल : gangals1234@gmail.com, gangals@ymail.com, gangals@live.in, gangals@in.com

‘आठवणींतले बाबासाहेब’ पुस्तक प्रकाशन

# रिसर्चसाठी एकेक वाक्य उपयुक्त आहे

**– सुशीलकुमार शिंदे**

‘‘वंचितवर्गाची पुस्तकं प्रसिध्द करण्याचं मोठं काम ग्रंथालीनं केलं आहे. सामाजिक क्रांतीइतकीच ही अक्षरक्रांती महत्त्वाची आहे.’’ योगीराज बागूल लिखित ‘आठवणींतले बाबासाहेब’ या पुस्तकाचं प्रकाशन केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते झालं त्यावेळी बोलताना ग्रंथालीच्या कार्याचा असा उल्लेख त्यांनी केला.

योगीराज बागूल यांनी आपलं स्वप्न सत्यात उतरवलं आहे. चळवळीतील माणूस, चळवळीत नसताना त्यांनी लेखणीनं कार्य साधलं आहे असा लेखकाचा गौरव त्यांनी केला. ते म्हणाले, ‘‘या प्रकाशनास यायला शक्य होणार नाही असं मी म्हटलं होतं. योगीराज बागूल यांनी पुस्तकाच्या प्रुफांची स्पायरल बाइंडिंग केलेली प्रत पाठवली होती. त्यातला गोडबोलेंचा लेख वाचला आणि ‘ग्रंथाली’त फोन करून बागूलांचा नंबर घेतला व मी प्रकाशनाला अवश्य येईन असं कळवलं. पुस्तकातला मजकूर वाचताना गहिवरून गेलो. पुस्तकातल्या प्रत्येक कॅरॅक्टरला महत्त्व आहे.’’

मोठ्या व्यक्तींशी जवळीक साधण्याचा प्रयत्न स्वाभाविक कसा असतो याबाबत स्वानुभव कथन करून ते म्हणाले,‘‘नवरत्नांच्या कहाणीतून, परिश्रमपूर्वक व सत्यता पडताळून साकारलेल्या बाबासाहेबांच्या आठवणींतील एकेक वाक्य रिसर्चसाठी उपयुक्त आहे. ग्रंथालयांमध्ये हा ग्रंथ पोचेल तेव्हा मुलं तो डोक्यावर घेतील.’’

दादर-माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये २८ मार्च रोजी झालेल्या या प्रकाशन समारंभात समाजवादी विचारवंत भाई वैद्य, अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष प्रा.एन.एम.कांबळे आणि आरसीएफचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर उदयशंकर झा अन्य वक्ते म्हणून उपस्थित होते.

‘‘बाबासाहेबांच्या आठवणींच्या या पुस्तकातून त्यांचे आगळे पैलू उलगडतात. बाबासाहेबांच्या विरोधकांना त्यांचा चारित्र्याबद्दल कधी आवाज उठवता आला नाही कारण त्यांचं चारित्र्य विशुध्द आणि तेजस्वी होतं. त्याबद्दलही लिहिलं गेलं पाहिजे, समाजापुढे मांडलं पाहिजे. दिल्लीतील जागा एका संस्थेला दिल्यावर तिथं आपलं नाव पाहून बाबासाहेबांनी त्यांना विचारलं, की इथे माझं नाव कसं? माझं नाव लावण्यासाठी ही जागा मी दिलेली नाही.’’ असं सांगून भाई वैद्य म्हणाले, पैशांनी संस्थांना आपलं नाव लावण्याऱ्या आणि जिवंतपणी स्वतःचे पुतळे उभारणाऱ्या या जगात बाबासाहेबांचे विचार किती मोठे होते याची जाणीव ठेवायला हवी.

प्रा. एन.एम कांबळे म्हणाले, ‘‘मी बाबासाहेंबाना फार जवळून पाहिलं आहे. विद्यार्थिदशेपासून मी त्यांच्यासोबत होतो. त्यांनी विश्वासानं माझ्यावर जबाबदाऱ्या टाकल्या. मी खात्रीनं सांगू शकतो की योगीराज बागूल यांच्या पुस्तकातील मांडणी सच्ची आहे. दहा-दहा वेळा भेटून खात्री




**प्रा. एन.एम. कांबळे यांचा सत्कार करताना सुशीलकुमार शिंदे. सोबत योगीराज बागूल आणि सुदेश हिंगलासपूरकर**

करून घेतलेली आहे.''

बाबासाहेबांसारखी मोठी माणसं आपल्या कामात इतकी व्यग्र असताना विविध व्यासंग आणि छंद कशी जोपासत हे मला पडलेलं कोडं आहे, असं सांगत एन.एम.कांबळे यांनी बाबासाहेबांच्या लाभलेल्या सहवासाबद्दल माहिती दिली.

लेखक योगीराज बागूल यांनी पुस्तकाबाबत आपलं मनोगत व्यक्त केलं. यावेळी त्यांच्या 'पाचट' या ग्रंथालीनंच प्रसिध्द केलेल्या आत्मकथनाची तिसरी आवृत्ती प्रकाशित झाली. आरसीएफचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर उदयशंकर झा यांच्या हस्ते त्याचं प्रकाशन झालं. योगीराज बागूल यांच्या लिखाणाचं महत्त्व विशद करून त्यांनी त्यांच्याबद्दल कौतुकोद्‌गार काढले.

'आठवणींतले बाबासाहेब' या पुस्तकात समावेश असलेल्या व्यक्तींपैकी बाळ साठे, एन.एम.कांबळे व बनस्पतीबाई दुलगज या बाबासाहेबांचा सहवास लाभलेल्या ज्येष्ठांचा सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. बाळ साठे यांनी बाबासाहेबांच्या आठवणी जागवल्या आणि त्यांना शिकवलेल्या व्हायोलिनवादनाचं प्रात्याक्षिक दाखवून कार्यक्रमास आगळी रंगत आणली.

या पुस्तकानिमित्त दिलीप जोशी व सहकाऱ्यांनी 'चिंरतन'-मार्फत तयार केलेली ध्वनिफित हे कार्यक्रमाचं वेगळं आकर्षण ठरलं. रसिकांकडून त्यास दाद मिळाली.

लतिका भानुशाली यांनी समयोचित आणि नेटकं सूत्रसंचालन केलं. श्रोत्यांनी व मान्यवरांनी त्याबद्दल त्यांचं विशेष कौतुक केलं.

□



बाळ साठे (वय ९४ वर्षे) यांच्या व्हायोलिनवादनाने रंगत आणली



बाळ साठे यांचा सत्कार करताना भाई वैद्य आणि सुशीलकुमार शिंदे



बनस्पतीबाई दुलगज यांचा सत्कार करताना सुशीलकुमार शिंदे

# समाजसुधारणा हे कर्तव्य मानलं पाहिजे

**– सु. गो. तपस्वी**

‘विकासाची रूपरेषा परिसंवादांच्या माध्यमातून...’ हे सु. गो. तपस्वी यांचं पुस्तक नुकतंच प्रसिद्ध झालं. त्यासंदर्भात धनजंय गांगल यांनी लेखकाशी केलेली बातचीत...

*आपण पुस्तकात मांडलेल्या उपाय-योजनेचं सार काय?*

खरं तर, त्यासाठी संपूर्ण पुस्तक एकत्र वाचायला पाहिजे, तरच त्या उपाययोजनेचं सार्थ आकलन होईल, पटण्याची शक्यता वाढेल. परंतु, पुस्तकाची ओळख करून देण्याकरता आपला प्रश्न योग्य आहे.

हे सर्वमान्य आहे की स्वातंत्र्याच्या आधल्या रात्री देशातील परिस्थिती खूप गुंतागुंतीची होती. दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता, धर्म-जात, भाषा ह्यांत विभागलेला देश व प्रत्येक घटकाची अस्मिता, जोडीला आर्थिक व नागरी विषमता.

दुसऱ्या दिवशी सकाळी ह्याच मानसिकतेत आम्ही स्वतंत्र झालो आणि संसदीय लोकशाहीकडे वाटचाल करत २६ जानेवारी १९५० ला प्रजासत्ताक देशाची घटना घोषित झाली. परंतु, आज तरी आपल्या समाजात लोकशाही मूल्यं आहेत का? प्रगतीतून होणाऱ्या बदलातून नव्या अर्थ व नागरी व्यवस्थेला लायक अशी आमची सामाजिक जोपासना घडवली गेली आहे का? ह्या सर्व प्रश्नांना आज ६० वर्षांनंतर ‘नाही’ हेच उत्तर आम्हाला द्यावं लागतं.

राजकीय, शासकीय-प्रशासकीय व्यवस्था व समाजाची मानसिकता ह्या गोष्टींची सांगड घातल्याशिवाय अपेक्षित सुदृढ समाज निर्माण करणं अशक्य आहे. ही दरीच आपल्या सर्व सामाजिक समस्यांना कारणीभूत आहे.

पाश्चात्त्य राज्यपध्दतीचं, लोकशाहीचं रोप आम्ही इथं लावलं, पण गरजेची मशागत करायला, ‘कल्चर’ निर्माण करायला आम्ही कमी पडलो. सुचवलेली उपाययोजना आहे ती औपचारिक व शास्त्रोक्त समाज-शिक्षणाचा शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची, लोकशाहीची, नागरिकत्वाची, सामाजिक बांधिलकीची मूल्यं समाजात रुजवण्याची. रेनेसान्समुळे जे पाश्चात्त्य देशांत चार-पाचशे वर्षांत सामाजिक उत्क्रांतीतून साधलं गेलं ती मूल्यं येथील समाजात पुढील पन्नास-साठ वर्षांत रुजवण्याचा प्रयत्न, हेच त्याचं सार.

*पारंपरिक प्रथांतून हेच नजरेस येतं की, मूल्यशिक्षण हे घरातून आई-वडिलांकडून मुलांना मिळतं. बालवयातील ते संस्कारच बहुतेकांना घडवतात. परंतु, आपल्या उपाययोजनेत असं वाटतं की तो पर्याय वगळला आहे.*

त्या पर्यायाला माझी हरकत नाही, पण त्या पारंपरिकतेत मी अडकलेलो नाही. त्याला तीन कारणं आहेत, ती आहेत शक्य नसलेला पर्याय, कितीही योग्य असला तरी, टाळण्याची. एक म्हणजे आजच्या व आगामी कुटुंब पध्दतीत आईवडिलांना- संयुक्त कुटुंबपध्दती जवळजवळ लयासच गेलेली असल्यामुळे - मुलांवर संस्कार करण्यास वेळ नसतो. मुलांना भाडोत्री संस्कारवर्गात पाठवून ते मोकळे होतात. कायद्यानं तर आज लग्नाविना स्त्रीपुरुष एकत्र राहून औरस संतती निर्माण होऊ शकते.

दुसरं महत्त्वाचं कारण आहे ते म्हणजे कोणत्याही सामाजिक परिवर्तनाचं लक्ष्य असायला पाहिजे ते संपूर्ण समाज. हा फक्त सुशिक्षितांच्या पाल्यांचा प्रश्न नाही. आदिवासी, वनवासी, झोपडपट्ट्या, निरक्षर खेडूत ह्यांच्या मुलांवर पारंपरिक पध्दतीनं, आईवडिलांकडून संस्कार कसे रुजवले जाणार?

तिसरं, आणि जास्त महत्त्वाचं कारण आहे, ते म्हणजे मी ज्या मूल्यांच्या उणिवेसंबंधी बोलतो आहे, ती मूल्यंच आपल्या समाजात आस्तित्वात नाहीत. आडातच नाही तर पोहोऱ्यात कुठून येणार?

*मलपृष्ठावरील परिच्छेदाच्या शेवटच्या ओळीत आपण म्हणता, सामाजिक नेतृत्वानं पुढे यालला पाहिजे, तेही बाह्या सरसावून! यातल्या ‘बाह्या सरसावून’ ह्या शब्दप्रयोगाचा अभिप्रेत अर्थ काय?*

एके काळी, समाज-बांधणीसाठी धर्म उदयास आला; ही हजारो वर्षांपूर्वीची गोष्ट. धर्माच्या अनेक गरजांपैकी ती एक महत्त्वाची बाब. समाजाच्या, समाजातील व्यक्तींच्या वागण्यात सुसूत्रता धर्मानं साधली समाजवर्तनावरील नियंत्रणासाठी, कालानुरूप धर्मात बदल होत राहिले, जाणवलेल्या उणिवांतून नवीन धर्म उदयास आले. ह्या दृष्टिकोनातून मला असं वाटतं, की धर्मशास्त्र म्हणजे समाजशास्त्र.

विविध विज्ञान व शास्त्रांच्या संशोधनातून त्या त्या विज्ञानाची, शास्त्राची उपयुक्तता जसजशी सिध्द होत गेली तसं ते ते शास्त्र लोकप्रिय झालं; सल्ला-मसलतीसाठी, उपाययोजनेसाठी जनता त्या त्या विषयातील तज्ज्ञाकडे जाऊ लागली.

आपल्याकडे लोकशाहीच्या मार्फत समाजावरील नियंत्रण देशाच्या संविधनातून कायदा व न्यायव्यवस्थेकडे आले आहे. त्यावर धर्माचा पगडा नाही, नसावा. अशा परिस्थितीत सुधारणा साधण्यासाठी, उध्दारासाठी आज धर्माचा वापर करणं अनिष्ट आहे. समाजशास्त्र ह्या विषयातील पंडितांनी समाजसुधारणा हे त्यांचं कर्तव्य मानून त्याकरता परिश्रम घेतले पाहिजेत, आपल्या शास्त्राची उपयुक्तता लोकांना पटवून दिली पाहिजे. त्याकरता समाज-शास्त्रज्ञांना वाचनालयातून, अभ्यासिकेतून बाहेर पडून रस्त्यावर यावं लागेल, सामान्य माणसापर्यंत पोचून आपलं म्हणणं पटवून द्यावं लागेल, लोकमान्यता मिळवावी लागेल. जे आगरकरांसारख्या सुधारकांचे प्रयत्न होते. ती धुरा पेलणं हे काही सोपं काम नाही.

*गेल्या दोन वर्षांत समाजिक विषयावरील आपली तीन पुस्तकं, 'ग्रंथाली'नं प्रकाशित केली; 'विकासाच्या वाटा- महाराष्ट्रातील अनुभवातून' आणि 'विकासाची आशा- 'मातृमंदिर'च्या अनुभवातून' व प्रस्तुतचे तिसरे 'विकासाची रूपरेषा- परिसंवादाच्या अनुभवातून, अर्थात तिसरा स्वातंत्र्य लढा'. असं हे ट्रिलॉजीचं लिखाण ठरवून झालं का?*

नाही, माझ्या शेवटच्या पुस्तकाच्या मनोगतात मी म्हटलं आहे तसं हे सारं लिखाण 'एकातून एक व एकामागून एक' असं झालं. तांत्रिकी पेशातील माझ्यासारखी व्यक्ती अशा विषयावर लेखन करेल असं भाकीत कोणी केलं असतं तर मी त्याला वेड्यात काढल असतं. तिसऱ्या पुस्तकाच्या जन्माची व घडण्याची कहाणी मी त्या पुस्तकातील 'पार्श्वभूमी व प्रयोजन' यामध्ये समग्र सादर केली आहे.

*करिअरशी संबंध नसलेल्या विषयावर निवृत्तीनंतर लिखाण करण्याचं धाडस कसं झालं?*

समाज, सामाजिक परिस्थिती व समाजकार्य ह्या विषयावर मी 'ग्रंथाली'च्या 'मराठी विद्यापीठ' ह्या उपक्रमाकरता 'काहीतरी' करावं, ही दिनकर गांगलांची सूचना पाच-सहा वर्षांपूर्वी माझ्याकरता आश्चर्याची होती; ते एक 'चॅलेंज' होतं. कोणतंही चॅलेंज 'अक्सेप्ट' करणं हा माझा स्वभाव. त्या 'काहीतरी'चं पर्यवसान म्हणजे प्रस्तुतची 'ट्रिलॉजी.'

तुम्ही हा प्रश्न, खरं तर, फार गोंडस शब्दांत विचारलात. विचारांच्या प्रचार-दौऱ्यात हाच प्रश्न फार खोचक पध्दतीनं एकानं मला विचारला होता. तो होता, 'तुमचं लोकांनी का ऐकावं, तुमची पार्श्वभूमी, अभ्यास काय? तुम्ही समाजाकरता काही भव्य-दिव्य, त्याग वगैरे केला आहे का?'

त्या व्यक्तीचा तो प्रश्न म्हणजे आमच्या 'नेत्याच्या मागे धावण्याच्या' वृत्तीची, 'नेता-प्रजा' ह्या रूढ नात्याची, सरंजामशाहीच्या मानसिकतेची व लोकशाही मूल्याच्या उणिवेची साक्ष आहे, असं मी मानतो. लोकशाहीत कोणीही मतप्रदर्शन करू शकतो, ती समाजातील प्रत्येकाची जबाबदारी असते. सुचवलेल्या गोष्टींवर विचार, चर्चा करून योग्यायोग्यता ठरवायची असते. आम्ही नेतेही असतो व प्रजासुध्दा. विचार मनातच न ठेवता प्रकट करणं, मत प्रदर्शित करणं, त्याचा पाठपुरावा करणं हे लोकशाहीमूल्य आहे.

*एकीकडे आपण म्हणता की राजकरण्यांना समाजसुधारणेत रस असणार नाही व सुचवलेली उपाययोजना देशव्यापी होण्यासाठी शासनाकडूनअंमलात आणली गेली पाहिजे असेही सुचवता. हा विरोधाभास हेच दर्शवतो की प्रस्तुतची उपाययोजना हे फक्त एक स्वप्नरंजन आहे, आदर्शवाद आहे.*

वरवर पाहता आपलं म्हणणं खरं आहे. पण लोकशाही राबवायची तर राजकारण्यांवर अंकुश निर्माण करणं गरजेचं आहे. तो अंकुश असतो सत्शक्तीचा. ती आज विखुरलेली आहे. तत्त्व, धर्म, राजकारणी पक्ष, भाषा, प्रांत ह्यांत विभागलेली आहे आणि म्हणून प्रभावहीन आहे.

अशा विखुरलेल्या सत्शक्तीचे संघटन साधलं, देशव्यापी दबाव निर्माण झाला तर न्यायालयातील जनहित याचिकांद्वारे वा मतपेटीतून असा दबाव राजकारण्यांवर आणता येईल. तशी अनेक उदाहरणं आपण अनुभवली आहेत.

*आपली मूळची राजकीय विचारसरणी कोणती व ह्या लिखाणाकरता आणि प्रवास व इतर अन्य खर्चाकरता, तो बराच झाला असणार, आपण कोणाकडून अर्थसाहाय्य घेतलं होतं?*

हा प्रश्न मात्र खोचक आहे हं. नाही, मी कोणाचंही अर्थसाहाय्य घेतलेलं नाही, व ते एकाच कारणाकरता, की ह्या संपूर्ण तात्त्विक मांडणीला कोणताही प्रचारकी थाट वा वास येऊ नये. तुम्ही म्हणता तसा खर्च बराच झाला, गेल्या सातेक वर्षांत दोन-अडीच लाख रुपयांच्या वर मी खर्च केले. परंतु, त्या खर्चापेक्षाही जास्त समाधान मला मिळालं. महाराष्ट्रातील सर्व विभागांतील लोकांचा परिचय झाला, विचार पडताळून पाहता आले व एक प्रकारे पुढील चळवळीसाठी, शक्य झाल्यास, गावोगावांत संपर्कस्थानं निर्माण झाली. आपण विचारलेल्या प्रश्नाच्या अर्थाचे प्रश्न काही गावांत विचारले गेले, पण मी व्यक्ती ह्या नात्यानं स्वखर्चानं गावोगावी विचारांच्या प्रचारार्थ व प्रतिसाद अजमावण्यासाठी फिरता आहे, हे लक्षात आल्यावर त्यांचा माझ्याकडे बघण्याचा कल निकोप झाला. माझ्यावरचा त्यांचा विश्वास प्रांजळ मतप्रदर्शनातून व्यक्त झाला.

*आपण प्रचारदौऱ्याचा उल्लेख केलात. त्याबद्दल काही सांगाल का?*

'काळाजी गरज' हा मूळ लेख मी महाराष्ट्रातील शे-सव्वाशे लोकांकडे प्रतिक्रियेसाठी पाठवला. चर्चेसाठी अनेकांना भेटलो. नंतर गरज भासली ती सुचवलेल्या पर्यायावर जनमत अजमावण्याची. ही सर्व प्रक्रिया मी पुस्तकात नमूद केली आहे. जनमत जाणून घेण्यासाठी, पर्यायाची शक्यशक्यता अजमावण्यासाठी मी चाळीसएक गावे फिरलो. ह्या गावांत माझे साठएक औपचारिक संपर्क कार्यक्रम झाले. डोंगरकडद्यासारख्या छोट्या छोट्या खेड्यापासून मुंबईसारख्या मेगा सिटीतील जनमानसाचं सर्वेक्षण एकाच वेळी, म्हणजे सप्टेंबर ते डिसेंबर-२००९ ह्या चार महिन्यांत मी भाषणं, गटचर्चा, वैयक्तिक भेटी अशा विविध संपर्ककार्यक्रमांतून साधलं. हे सारं तपशिलात पुस्तकात आहे.

*आपले विचार कृतीत आणण्याचसाठी प्रयत्न करावे लागतील. तो पुढाकार कोण घेणार, मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार?*

प्रत्येक गोष्ट पायरी पायरीनं होत असते, साधायची असते. व्यक्तीच्या मर्यादा असतात, ह्या गोष्टीचं भान मला आहे. स्वतःच्या आवाक्याचं आकलनसुध्दा महत्त्वाचं. माझी झेप कुठपर्यंत जाऊ शकते, त्याचा मी विचार केला आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे एखाद्या देशव्यापी चळवळीसाठी 'मीच शहाणा, माझंच बरोबर' ही भावना आत्मघातकी व लोकशाहीच्या मांडणीत अयोग्य आहे.

ह्या दृष्टिकोनातून पहिली पायरी म्हणजे संघटनाला सुरुवात करण्यासाठी संपर्कातील सर्व व्यक्तींना एकत्र आणणं. त्या दृष्टीनं एका मेळाव्याचे येत्या मे महिन्यात आयोजन करण्यास मी सुरुवात केली आहे. त्या मेळाव्यात सामूहिक रीत्या पुढील कारवाईवर विचार होईल.

*मेळाव्याला प्रतिसाद लाभला नाही वा मेळाव्यातून विशेष काही साधलं नाही तर? आणि देशातील आजची विचारसरणी बघता अशा गोष्टींची शक्यता नाकारता येत नाही.*

मी नकारार्थी विचार करत नाही. आशावादी दृष्टिकोनातून काहीतरी साधलं जाईल असंच मी मानतो.

ह्या संदर्भात नांदेडमधील भेटीत 'प्रजावाणी'चे सुधाकर डोईफोडे म्हणाले होते, की कोणत्याही सक्षम बीजाला अनुकूल पर्यावरणातच कोंब फुटतो. सुचवलेला पर्याय हे तसं बीज आहे व आज जरी बीजाला योग्य पर्यावरण लाभलं नाही तरी उद्याच्या पिढीकरता ही उपाययोजना व तिच्यावरील साधकबाधक विचार ग्रथित झाले पाहिजेत. मला वाटतं, किमान डोईफोड्यांचा सल्ला मी अंमलांत आणला आहे; पर्यावरण केव्हा अनुकूल होईल ते काळ ठरवेल.

□

८२वे अखिल भारतीय साहित्य संमेलन २०,२१,२२ मार्च रोजी झाले. संमेलनाध्यक्षांविना झालेले हे पहिलेच साहित्य संमेलन. जे घडले त्याची प्रातिनिधिक प्रतिक्रिया या कवितेत कवीने व्यक्त केली आहे.

## गहिवर

करी शब्दांची निर्मिती
त्याची ख्याती देशभर
नव्या युगाचा सर्जक
ऐसा ज्ञानी नरवर
    त्येचा 'गोतावळा' किती
    कागल झालं विश्वभर
    ऐसा 'खळाळ' शब्दांचा
    'नटरंग' मातीवर
या मातीच्या रिनाची
'झोंबी' त्याले अंगभर
एका एका ग्रंथातून
केली उत्राई सत्वर
    ऐसा संत गा आजचा
    घराघरात वावर
    बांधावरच्या कुणब्यानं
    केला लेखणीचा नांगर
केली मशागत ऐसी
थक्क शारदेचा दरबार
ऐसा सारस्वत राजा
झाला सिंहासनाधिश्वर
    त्याच्या जीवितकार्याला
    पण लागली नजर
    आमच्या मराठी बाण्याचा
    वार-करी हो खंजीर
पुन्हा काळ तोच आला
'सूर्य' डोहाचा अंधार
बडव्यांनी ज्ञानियाच्या
केला हटवादी येव्हार
    तेव्हा इंद्रायणीतही
    आनंद तरंग अपार
    आज 'आनंदाचे' डोही
    त्येच्या कार्याचा विसर
वैष्णवांनी बुडविला
विवेक अन् विचार
सहिष्णुतेलाहो आज
नाही उरे पारावार
    कैसा आला गा हा काळ
    करी वार संतावर
    या ईपरीताने हो
    व्यथित महाबळेश्वर -
अभिव्यक्तिचा मेळावा
सैरभैर हो अक्षर
अवघ्या साहित्य दिंडीला
आज येई गहिवर

**- लक्ष्मीकांत रांजणे**
'श्रीकृपा' शिवाजीनगर,
वाई (सातारा) ४१२८०३
मोबाईल : ९४२३८०३९५५




# कॉलनी

## विनायक गोखले

यावर्षीचा केशवराव कोठावळे पुरस्कार सिद्धार्थ पारधे यांच्या 'कॉलनी' या पुस्तकास जाहीर झाला आहे. त्या निमित्ताने...

'कॉलनी' ही जात न सांगता यशस्वी झालेल्या सिद्धार्थची कहाणी. पारधी समाजात जन्मलेल्या सिद्धार्थची कहाणी 'साहित्यसहवास' लाभल्यामुळे सफल संपूर्ण होते हे त्याचे कॉलनी हे आत्मकथन वाचताना आपल्याला अनुभवता येते.

सिद्धार्थ पारधेचे वडील लक्ष्मण पारधे वांद्रे येथील साहित्यसहवासाच्या उभारणीच्या कामात सुरुवातीपासून जे जे काम करावे लागले ते करत. खाडीत मातीचा भराव टाकणे, पायाभरणी करणे, स्लॅब ओतणे, सुतारकाम, गवंडीकाम, प्लंबिंगकाम, असे करत नऊ इमारती पूर्ण झाल्यावर ते तेथे बागकाम व रखवाली करणे ही कामे करू लागले.

यासाठी त्यांना व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तिना अतोनात कष्ट घ्यावे लागले. मुंबईत आल्यावर, सुरुवातीला काहीच काम नसे तेव्हा रात्री कॉलनीत भिक मागणे व जे काही अन्न मिळेल त्यात दिवस साजरा करणे असे दिवस काढले. सतत मक्याच्या भाकऱ्या व लाल मिरचीचा ठेचा खाऊन लहान भांवडांचे पोट बिघडे. ७२ च्या दुष्काळात तर त्यांनी गुरांच्या शेणातली ज्वारी स्वच्छ करून त्याच्या भाकऱ्या खायला घातल्या.

त्याहुन मोठे दुःख म्हणजे सिद्धार्थ व त्याचा लहान भाऊ राजेंद्र आजारी पडले तेव्हा. जेथे जेवणाची भ्रांत तेथे औषधासाठी पैसे कोठून आणणार? असा प्रश्न होता. त्यामुळे अनेक लोकांनी सिद्धार्थच्या आईला सल्ला दिला की दोघांवर औषधासाठी तुझ्याकडून पैसे खर्च होणार नाही तर तू एकासच जगव, नाहीतर दोन्ही मरतील. आईने सिद्धार्थ मोठा म्हणुन त्याला औषधे दिली आणि राजेंद्रकडे दुर्लक्ष झाले. बघता बघता एक दिवस राजेंद्र या जगातून कायमचा निरोप घेऊन गेला. येथे लेखक लिहितो, अशी गरिबी देवाने कोणाला देऊ नये. आणि दिलीच तर आजारपण देऊ नये.

इतके कष्ट करूनही शिक्षणाची ओढ मात्र नायकाकडे आहे. एकेक पैसा जमा करून आपले शिक्षण पूर्ण करतो. पुढे कॉलेजमध्ये प्रवेश होतो. पदवी मिळवतो. या सर्व प्रवासात नामवंत साहित्यिकांचा प्रेमळ अनुभव जागोजागी मिळत राहतो. त्यात विं.दा.करंदीकर, अनंत काणेकर, व.पु.-काळे, सुभाष भेण्डे, मं.वि.राज्याध्यक्ष, य.दि.फडके, रमेश तेंडुलकर असतात. खरे पाहता, चौऱ्याऐंशी कुटुंबे पारधे कुटुंबीयांना या ना त्या प्रकारे मदत करित होती.

कष्ट करून लक्ष्मी मिळते पण जर तीस सरस्वतीची साथ मिळाली तर पारधे कुटुबीयांसारखी स्थिती सर्वांचीच होईल.

या आत्मकथनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे ज्यांनी मदत केली त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे पण ज्यांनी मदत नाही केली त्यांच्याबद्दल आकसाने न लिहिता समाजातील प्रवृत्तीचे दर्शन घडवले आहे.

जाता जात नाही ती जात ही म्हण खोटी ठरवणारे कर्तृत्व चाळीशितल्या या तरुणाने दाखवले आहे.

कामधंदा, नोकरीसाठी कोठेही जातीचे प्रमाणपत्र दाखवले नाही याचे कारण म्हणजे वयाच्या बाबीसाव्या वर्षापर्यंत कोणी त्याला जात विचारलीच नाही. सर्व जातिंच्या माणसांच्या रक्ताचा रंग लालच असतो मग हे प्रमाणपत्र हवे तरी कशाला? लाल, भगवा, हिरवा, निळा, हे भेद आपणच तयार केले आहेत.

आपण शिकलो तर संघटित होऊ व संघर्ष करू हा बाबसाहेबांचा मंत्र घरात फोटो न लावता देखील त्याने आचरणात आणला. दुसरा एक जाणवलेला गुणविशेष म्हणजे इतक्या मोठ्या लोकांच्या ओळखी असूनही त्यांच्या लोकप्रियतेचा फायदा घेतला असे कोठे ही दिसत नाही. साऱ्या भारतीयांचे दैवत असलेला सचिन तेंडुलकर हा तर लहानपणीचा खेळगडी, त्याच्याबद्दलही आदराने लिहिले आहे.

ज्या साहित्यसहवासामुळे आपण घडलो या आदराच्या भावनेपोटी तेथे एखादी रिकामी जागा झाली तरी ऐपत असूनही त्याकॉलनी समोरील एक जागा विकत घेतली व त्या कॉलनीचा सहवास मिळत राहावा ही इच्छा पूर्ण केली. साहित्यसहवासात न येण्याचे कारण म्हणजे तेथे आजही त्यांच्या घरातील माणसे घरकामाला येतात. आज उत्तम सुबत्ता असूनही पूर्वीचे दिवस आठवतात. ज्या दुकानात महिन्याचे पंधरा दिवस घरी जेवण मिळण्यासाठी घरातील तांब्याची कळशी गहाण ठेवावी लागत होती त्याच दुकानात आज कोणतीही वस्तू सहज खरेदी करू शकतो.

या पुस्तकात असे अनेक प्रसंग आहेत की, ते वाचताना आपण सुन्न होऊन जातो. चाळीस वर्षांपूर्वी अशी परिस्थिती असूनही माणसे जगण्यासाठी संघर्ष करीत होती आणि त्यांना मदत करणारी एक नाही तर शेकडो माणसे होती. हे आपण सर्वांनी वाचलेच पाहिजे असे पुस्तक आहे. मराठीतले एक महत्त्वाचे आत्मकथन म्हणून याची नोंद अवश्य घ्यावी लागेल.

**– विनायक गोखले**
२०१, लक्ष्मी पॅलेस, कोपरी रोड,
नौपाडा–ठाणे – ४०० ६०२

## स.न.वि.वि.

‘रुची’चे सारेच अंक विचारप्रधान असतात. ज्वलंत समस्येवर प्रकाशझोत टाकतात. मार्च २००९ च्या अंकातील विशेष लेख– कणकवलीमध्ये झालेल्या दहाव्या विद्रोही मराठी संमेलनाचा वृत्तांत देणारा होता. ‘आम्ही बुद्ध स्वीकारला असला तरी’ हे संजय पवार यांचे भाषण मला आवडले. अभिनंदन! ‘त्या बड्या बंडवाल्यात ज्ञानेश्वर माने पहिला’ ही ओळ मी कालनिर्णय दिनदर्शिकेत वीस-पंचवीस वर्षांपूर्वी वाचलेली आठवते. सातशेअठरा वर्षांपूर्वी जेव्हा ज्ञान संस्कृत भाषेत बद्ध होते, तेव्हा ज्ञानेश्वरी ऊर्फ भावार्थदीपिका लिहून, स्वत: अतोनात हाल सोसून ज्ञानाची कवाडे सर्वांसाठी खुली केली. *रचूनि ज्ञानेश्वरी ज्ञानेशाने । उघडली ज्ञानाची दालने ।।* सर्वच समाजसुधारकांचे ऋण समाजाने मान्य केलेच पाहिजे! जोतिबा फुले, सावित्रीबाई, महर्षी कर्वे व त्यांची पत्नी, राजा राममोहन रॉय, रामकृष्ण परमहंस व त्यांच्या सहधर्मचारिणी शारदामाता, विवेकानंद आदींचे स्मरण न केल्यास आपण कृतघ्न ठरू. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रणाम करून, स्वामी विवेकानंद विचारांवरील काव्यपुष्प उद्‌धृत करते.

*दिवस उगवता येतो ।*
*घेऊनी नजराणा नवनव्या अनुभवांचा ।*
*संतवचन सार्थ किती हे ।*
*मानव विद्यार्थी जीवनभरचा ।।*
*गतिमान हा असे समाज*
*परिवर्तनशील असे येथली व्यक्ती ।*
*अनादिअनंत परमात्म्याची म्हणोनी*
*करावी भक्ती ।।*


अर्थकारण सदरातील यशवंत पंडितराव यांचा लेख वाचून मनपाखरू पस्तीस वर्षे मागे गेले. प्राध्यापिका अमरजा नेरूरकर व प्राध्यापक रमेश पानसे यांनी शिकवलेला अर्थशास्त्र विषय आठवला. बाजारपेठेत अर्थशास्त्रीय नियमानुसार तेजी-मंदीची चक्रे ठरावीक काळाने येतच असतात. मागणी-पुरवठा यांच्या प्रमाणावर किंमत ठरते. प्रमाण व्यस्त झाल्यास किमतीत चढउतार होतो. कौटिल्य, माल्थस, रिकॉर्डो किन्स या अर्थशास्त्रज्ञांच्या बरोबरीने म. गांधींची ‘टॉलस्टॉय’ फार्म संकल्पना आठवली.

त्यांनी मांडलेल्या जीवनमान (Standard of life) राहणीमान (Standard of living) या दोन संकल्पना आठवल्या. म. गांधींचे नाव घेताच डोळ्यांसमोर खादी ग्रामोद्योग दिसू लागतात. जन्यजनक भावाप्रमाणे मला स्वाध्यायप्रणेते पांडुरंगशास्त्री यांचे ‘व्यासविचार’ पुस्तक आठवले. त्यात त्यांनी ‘अमृतालयम्’ नावाची संकल्पना मांडली आहे. त्याचे साधर्म्य ‘इराडिक’ कल्पनेशी आहे. सर्व गावकऱ्यांनी श्रमदानाने उत्पादन करून उत्पन्नाचा काही भाग देवळात ठेवायचा. त्यावर सामायिक मालकी असून गरजूंना तो भाग द्यायचा. सर्व गावकऱ्यांनी पाळीपाळीने मंदिराचा कारभार पाहायचा.

अभय पाटील यांचा ‘बे एरिया संमेलन’ (महासागरापलीकडील) हा लेख वाचला. नंतर अनंत ठकार यांचा ‘व्यापक विचार व्हावा’ हा लेख वाचल्याने दोन्ही बाजू आम्हा वाचकांना समजल्या. उभयतांना धन्यवाद!

**– सौ. स्मिता दत्तात्रय पाटील**
बी/१, वर्षा, दत्तपाडा, स्टेट बँकेसमोर,
बोरिवली (पूर्व), मुंबई ४०००६६

**दोन ताजी प्रकाशने**



**आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**
**यशवंतराव पंडितराव**
मूल्य १०० रुपये : सवलतीत ६० रुपये



**बालकल्याण ते बालकहक्क**
**माधुरी भिडे**
मूल्य ५० रुपये : सवलतीत ३० रुपये